ठाणे जिल्हा स्वकुळ
१९८२
साळी समाज


# स्वकुळ समाचार

www.swakulsamachar.com



वर्ष १२ वे, अंक ०३ रा, मे - जून २०२६, ठाणे, पाने -३६

फक्त सभासदांकरीता



## स्वकुल साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी २१ वा वर्धापनदिन व "स्वकुल साळी समाजाचा इतिहास"

## या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा क्षणचित्रे. दि.२३/०४/२०२६








अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित
नोंदणी क्र. ई / ९२८ / ठाणे दि. १७/०५/८८

# स्वकुल समाचार

RNI No. MAHMAR/2014/57230

कार्यालय : फ्लॅट नं. ०१, साईसेवा नं. २ को. ऑप. हौ. सोसा.,
जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१

अध्यक्ष : सौ. शैलजा सोमनाथ कासटकर मो. ९८२०१४५४५१
अधिष्ठान, प्लॉट नं. सी-वन, निवारा हौसिंग सोसायटी, स्टार कॉलनीजवळ, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे - ४२१ २०४
सचिव : ॲड, सोनाली अरविंद दाहोत्रे मो. ९८६७१७०५०७
सहसचिव : श्री. महेश खंडू कापरे मो. ९८२१२५१९७३
उपाध्यक्ष : सौ. संगिता उदयकुमार साळी मो. ८३०८७००३५०
उपाध्यक्ष : श्री. देवेन पुष्पलाल क्षिरसागर मो. ९३२०६१४५७३
कोषाध्यक्ष : डॉ. श्री. किसन जगन्नाथ जेधे मो. ९८३३८२०६०१
सहकोषाध्यक्ष : श्री. स्नेहल भरत एडके मो. ९२२०९१९८९७

संपादक : श्री. ईश्वरलाल एकनाथ साळी (फंड)
बी-३०४, छन्नुर भवन सहकारी गृहनिर्माण संस्था, जी. गुप्ते रोड, विष्णूनगर, डोंबिवली (प)
मो. ८६५२२१५१६३
सहसंपादक : श्री. शिवाजीराव सदाशिव आमते मो. ९०९६४०३८००
श्री. राजेश शंकरराव साळी मो. ९९६७५८४०३२
श्री. सचिन किसन शिवदास मो. ९३२४२२३५१७
वेब डिझायनर : श्री. बाळकृष्ण साळी, सुरत मो. ९०३३६०३६१३
अंतर्गत हिशोब तपासणीस : श्री. बारसू रामदास सिताफळे

सल्लागार
: श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर मो. ९८२०८२१७२६
: श्री. भालचंद्र नेमिचंद साळी मो. ९७०२६४४२३२
: श्री. उदयकुमार लालचंद साळी मो. ९३२३३८६१३९
: श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव मो. ९७५७०८६९१५
आर्थिक : श्री. नितिन ढवण (सीए) मो. ९८२२४५६७६६
कायदेशीर : ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे मो. ९८३३५२७१२२

**या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक सहमत असतातच असे नाही ... संपादक**

**पत्रव्यवहार व लेखन साहित्य पाठविण्यासाठी :-**
E-mail : sampadakswakulsamachar@gmail.com
Website : www.swakulsamachar.com

## अधिकृत प्रतिनिधी

१) श्री. अशोक शिवदास साळी, सुरत ९९०९६०१९७०
२) श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल ९४२३३४३८३०
३) श्री. बाळकृष्ण मारुतीराव डंबरे, बडोदा ९४२६०२५११४
४) श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण ९०२१५६४०२८
५) श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर ८७७९१७२९८६
६) श्री विलास बाबुराव सरोदे, औरंगाबाद ९४२१४३१७३३
७) श्री अभय प्रभाकर पाटेकर, भोपाळ ९४२५६०८०१९

**नविन अधिकृत प्रतिनिधींच्या नियुक्ती साठी अर्ज मागविण्यात येत आहे.** - १) प्रतिनिधीचे वय २१ ते ७० या दरम्यान असावे. तसे ते स्थानिक संस्थेचे सभासद असावेत. २) स्वकुळ समाचारसाठी जास्त वेळ देणारे तसेच नविन सभासद, जाहिरात, देणगी, इमारतनिधी आणि आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृतांत तात्काळ देणारे असावेत. ३) संस्थेबद्दल आस्था असणारे सुशिक्षित व संस्थेसाठी तन, मन, यथाशक्ती धन अर्पण करणारे असावेत.

**जाहिरातीचे दर -** रंगीत पूर्ण पान रु.६,०००/- साधे पूर्ण पान रु.१,२००/- साधे पावपान रु.५००/-
रंगीत अर्धेपान रु.३,०००/- साधे अर्धेपान रु.६००/-

वृतांतामधील कृष्ण धवल पासपोर्ट साईज फोटो प्रोसेसिंगकरीता रु. १००/- जाहिरातीसोबत पाठवावे. (फोटोची इमेज चांगली हवी.)

०१
कै. नेमिचंद सोनू साळी व कै. यमुनाबाई नेमिचंद साळी यांच्या स्मरणार्थ
श्री. भालचंद्र ने. साळी व श्री. संजय ने. साळी (डोंबिवली) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

४६
कै. दत्तात्रय सदाशिव आमते यांचे स्मरणार्थ श्री. लक्ष्मीकांत दत्तात्रय आमते व
श्री. गणेश दत्तात्रय आमते, बदलापूर यांच्या सौजन्याने पृष्ठदान

**साळी समाजातील सर्व सभासदांना नम्र विनंती आहे की आपण आपले सभासत्वाचे नुतनिकरण करुन घ्यावे ही नम्र विनंती.**

**नविन दर खालीलप्रमाणे आहेत.**

| | | |
|---|---|---|
| १) | नवीन सभासद वर्गणी (पाच वर्षाकरिता) | रु. १,०००/- |
| २) | उपवर वधू नोंदणी वर्गणी | |
| | ०३ अंकासाठी | रु. ४५०/- |
| | ०६ अंकासाठी | रु. ९००/- |
| | १२ अंकासाठी | रु. १,५००/- |
| ३) | विश्वस्त निधी | रु. १,५००/- |
| ४) | आधारस्तंभ (स्मृतीपुष्प) | रु. १,५००/- |
| ५) | पृष्ठदान | रु. १५,०००/- |
| ६) | मंगल निधी. | रु. ५००/- |

वर दिलेले सर्व पेमेंट खालील अकाउंट नंबरला NEFT/RTGS/IMPS/UPI तसेच QR CODE ने पाठवू शकता. पेमेंट पाठविल्याचा स्क्रीन शॉट ९४२२६८६८५५ या व्हाट्सअप नंबरवर पाठविण्यास विसरु नये सोबत आपला फुल पोस्टल ॲड्रेस पिनकोड सह व मोबाईल नंबर पाठवावा म्हणजे आपणास आपली रिसिट आपल्या मोबाईलच्या व्हाट्सअपवर त्वरित पाठविण्यात येईल, सहकार्य असावे.

**Favouring : SWAKUL SAMACHAR**
**BANK NAME : DOMBIVLI NAGARI SAHAKARI BANK**
**BRANCH : NANDIVALI ROAD DOMBIVLI (EAST)**
**IFSC CODE : DNSB0000009**
**ACCOUNT NUMBER : 009010100002199**

आपले विनीत
संपादक स्वकुळ समाचार

---

## स्वकुळ समाचारचे पंचवार्षिक नविन सभासदांचे हार्दिक स्वागत!

| | सभासदांचे नाव | पावती क्रमांक | दिनांक | सभासद क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१) | श्री. ज्ञानेश्वर चिंतामण भागवत | ७०९/१७२ | ०८/०३/२०२६ | ३१०३०४ |
| ०२) | श्री. अनिल वसंत ढोकळे | ७०९/१७३ | ०८/०३/२०२६ | ३१०३०५ |
| ०३) | श्री. राजीव मधुकर आढाव | ७०९/१७४ | ०८/०३/२०२६ | ३१०३०६ |
| ०४) | श्री. अनिल आदिनाथ हरवंदे | ७०९/१७९ | २२/०३/२०२६ | ३१०३०७ |
| ०५) | श्री. नंदू नारायण आठवले | ७०९/१८० | २३/०३/२०२६ | ३१०३०८ |
| ०६) | श्री. मोहन शंकर काजळे | ७०९/१८७ | १८/०४/२०२६ | ६३१०४० |
| ०७) | श्री. परमेश्वर दत्तात्रय गदगे | ७०९/१८८ | १८/०४/२०२६ | ३१०४०२ |
| ०८) | श्री. वैभव रतिलाल पटेल | ७१०/२०१ | २१/०४/२०२६ | ३१०४०३ |
| ०९) | श्री. मयूर अंबालाल मुरकुटे | ७१०/२०२ | २१/०४/२०२६ | ३१०४०४ |
| १०) | सौ. वैशाली मधूकर निमकर | ७१०/२०३ | २३/०४/२०२६ | ३१०४०५ |
| ११) | श्री. अशोक विठ्ठलराव साळी | ७१०/२०४ | २३/०४/२०२६ | ३१०४०६ |
| १२) | श्री. स्वरुपजी विजयकुमार कंकाळ | ७१०/२०५ | २३/०४/२०२६ | ३१०४०७ |
| १३) | श्री. रमेश नामदेव घोंगे | ७१०/२०६ | २३/०४/२०२६ | ३१०४०८ |
| १४) | श्री. विजेंद्र रामदास बागडे | ७१०/२०७ | २३/०४/२०२६ | ३१०४०९ |

### ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संलग्न सात संस्थांची नावे

१) स्वकुळ साळी समाज, भिवंडी अध्यक्ष : **श्री. आनंद पावले** 9860560497
२) स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था, डोंबिवली अध्यक्ष :**श्री.पंकज दिवटे** 9820882289
३) स्वकुळ साळी समाज,कल्याण अध्यक्षा : **सौ शरयू पाठक** 9867927963
४) श्री जिव्हेश्वर स्वकुळ साळी समाज, बदलापूर अध्यक्ष : **श्री.संजीव साळी** 9320442911
५) स्वकुळ साळी समाज, उल्हासनगर अध्यक्ष : **श्री मंगेश कनोजे** 9321886645
६) स्वकुळ साळी समाज, अंबरनाथ अध्यक्ष : **श्री. मिलिंद जांभळे** 7875523388
७) स्वकुळ साळी समाज, ठाणे शहर अध्यक्ष : **डॉ. प्रतिक्षा बोर्डे**. 9867248232
(ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज कार्यकारिणीचे पदसिद्ध सभासद)



**कै. सौ. शुभलक्ष्मी नारायणराव कांबळे यांच्या स्मरणार्थ ठाणे येथील श्री. अमित नारायणराव कांबळे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

# संपादकीय



नमस्कार, जय जिव्हेश्वर

सर्वप्रथम स्वकुळ समाचारचे सर्व सभासद, समाज बंधू - भगिनी, वाचक वृंद, सर्व पदाधिकारी, सल्लागार, हितचिंतक, जाहिरातदार सर्वांना मराठी नववर्षाच्या, वसंत ऋतूच्या हार्दिक शुभेच्छा. झाडांना नवीन पालवी आलेली आहे, झाडे हिरवीगार दिसत आहे. सगळीकडे आनंदी आनंद आहे त्याचप्रमाणे आपल्या भारत देशात अनेक धर्म, जाती, पंथ, भाषा आहेत. त्यातल्या त्यात हिंदू धर्मात उत्सवाचे खूप महत्व आहे आणि प्रत्येक सण साजरा करण्यामागे एक उद्देश असतो की आपापसातील संघटन वाढवून एकता, प्रेम निर्माण करणे, संस्कृतीचे संवर्धन करणे, समाज संघटन करणे यासाठी या वर्षात ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्थेने समाज संघटन व लोकांमध्ये एकता, प्रेम वृध्दिंगत करण्याच्यादृष्टीने पावले उचलली असून तसेच व्यक्तींमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्याकरिता व्यासपीठ निर्माण केले असून त्याकरिता संस्था विविध उपक्रम राबवीत आहे. संस्थेने १३/०४/२०२५ रोजी भिवंडी येथे वासंतिक मेळावा, ०८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिन महिला मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रम, १२ एप्रिल २०२६ रोजी डोंबिवली येथे वासंतिक मेळाव्याचे आयोजन केले. अशाप्रकारे संस्था विविध मार्गाने संघटन व प्रेम वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असते. त्याचप्रमाणे समाज संघटनाचे दुसरे माध्यम स्वकुळ समाचार, समाज प्रबोधनातून समाज संघटन, बंधू-भाव, प्रेमाचे संबंध, सामाजिक विकास निर्मितीचे काम स्वकुळ समाचारच्या माध्यमातून ही संस्था करीत असते त्यासाठी आर्थिक निधीची आवश्यकता असते तरी सर्व समाज बांधवांनी आपण स्वत: आणि नातेवाईक यांना स्वकुळ समाचारचे पंचवार्षिक सभासद होण्यासाठी आव्हान करीत आहोत या दृष्टीने संस्थेला आर्थिक मदतही मिळेल आणि आपणास स्वकुळ समाचार विविध साहित्यांनी नटलेला अंकाचाही आस्वाद घेता येईल. तसेच आपण या अंकासाठी पृष्ठदान रु.१५०००/-, विश्वस्त निधी संस्थेचे विश्वस्त म्हणुन रु.१५००/- व आधार स्तंभासाठी रु.१५००/- आपल्या पूर्वजांच्या स्मरणार्थ देणगीकरीता आवाहन करीत आहोत तरी समाज बांधवांनी सढळहस्ते आर्थिक मदत करावी ही विनंती त्याचप्रमाणे उपवर-वधू नोंदणी करिता मुला मुलींची नावे पाठवावी त्यास आम्ही नाम मात्र शुल्क घेऊन प्रसिद्धी देत असतो. यातूनच संस्था समाजातील समाज बांधवांना वैद्यकीय व शैक्षणिक मदत करीत असते. तसेच या उपक्रमाद्वारे समाजातील समाज बांधव, विद्यार्थी यांना विविध कलागुणांना वाव देत असतो त्याकरिता सर्वांनी आपल्याकडे असलेले लिखित साहित्य, कविता,लेख, कथा आपण व्हाट्सअप ग्रुपवर किंवा संस्थेच्या प्रतिनिधी मार्फत या sampadakswakulsamachar@gmail.com मेलवर पाठवू शकतात त्यास आपण विनामूल्यप्रसिद्धी देत असतो त्याच प्रकारे आपण पाठविलेल्या व्यवसायिक जाहिराती, शुभेच्छा जाहिराती कमीत कमी चार्जेस घेऊन प्रसिद्ध करीत असतो असा हा आपला विविधरंगी स्वकुळ समाचार अंक आहे. धन्यवाद.

**संपादक श्री.ईश्वरलाल साळी, डोंबिवली (प.)**

**स्वकुळ समाचार मासिक ठाणे जिल्ह्यातर्फे प्रकाशित करण्यात येणारे नोंदणीकृत सामाजिक पत्रिका असून या मासिकात प्रसिद्ध करण्यात आलेले लेख, जाहिरात, वधूवर जाहिरात, इतर कोणतेही लेखन साहित्य व जाहिराती यांची सत्यता आणि कायदेशीर बाबी आम्ही तपासून पहात नाही, त्या मताशी संपादक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही, स्वत: सत्यता तपासल्याशिवाय व्यवहार करू नये. नुकसानीसाठी संपादक अथवा संपादक मंडळ जबाबदार असणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

०३
कै. रतिलाल हरी कासटकर व कौ. मंजुळाबाई रतिलाल कासटकर (एरंडोल) यांच्या स्मरणार्थ
सौ. शैलजा सोमनाथ कासटकर व श्री. सोमनाथ कासटकर (डोंबिवली) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

३६
कै. गणेश शंकरराव साळी (डहाके) एरंडोल यांचे स्मरणार्थ
श्री. प्रभाकर गणेश साळी व सो. सुमती प्रभाकर साळी
(टिटवाळा) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

॥ श्री जिव्हेश्वर प्रसन्न ॥ रजि.नं.महा ३७१/२५/४/१९५४ ॥ श्री विठ्ठल-रुक्मिणी प्रसन्न ॥



# श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर.



२०, २१ बेगम पेठ, विजापूर वेस, सोलापूर - ४१३००५

**आयोजित**

## स्वकुळसाळी समाज उपवधू-वर पालक परिचय मेळावा - २०२६

आदरणीय समाज बंधु-भगिनींनो सस्नेह नमस्कार कळविण्यास आनंद होत आहे की, रविवार दि. ३१/०५/२०२६ रोजी श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर आयोजित उपवधू-वर मेळाव्यास आपले व पाल्यांची उपस्थिती प्रार्थनिय आहे.

- **मेळाव्याची तारीख व वेळ :-** रविवार दि. ३१/०५/२०२६ • **वेळ -** सकाळी ९ ते सायं. ५ वाजेपर्यंत
- **मेळाव्याचे स्थळ :- श्री महालक्ष्मी बँक्वेटस्** D-10 MIDC पोलीस ठाणे समोरील रस्ता, R.B मार्ट जवळ, अक्कलकोट रोड, MIDC, सोलापूर.

स्थळ - स्वकुळसाळी समाज उपवधू-वर मेळावा २०२६

- **प्रवेश फॉर्म विनामुल्य उपलब्ध आहे.**

१) अंध, अपंग व गरीब समाजबांधव यांना मोफत प्रवेश आहे.
२) उपवधु व उपवरासाठी नोंदणी शुल्क रु. ८००/- रुपये (एक स्मरणिका + तीन भोजन कुपन) प्रत्येकी.
टिप - अल्प उत्पन्न धारक समाजबांधावांच्या उपवधुसाठी नोंदणी शुल्क रु. ४००/- फक्त आणि ऐच्छिक आहे.
३) मेळाव्यासाठी येणाऱ्या उपवधू-वर व पालकांव्यतीरिक्त येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस प्रवेश शुल्क १५० रु. गेटवर घेऊनच प्रवेश देण्यात येईल.
४) उपवधु-वरांची पुरवणी छापण्यात येणार नाही.

सदर मेळाव्यात उपवधू-वर यांचा एकमेकांना प्रत्यक्ष परिचय करण्यासाठी स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आला आहे. तरी उपवधू-वर यांना आणणे आवश्यक आहे. यांच्या सोबत आपली उपस्थिती आवश्यक आहे. नोंदणी फॉर्म कोणत्याही गावातील बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखेत

**श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर**

**A/c No. 60560131120 IFSC Code - MAHB0000464**

(बँक ऑफ महाराष्ट्र, साखर पेठ, शाखा सोलापूर) वर भरुन कॉऊंटर स्लिप फॉर्म सोबत जोडावी.

टिप - QR कोडवर नोंदणी शुल्क पाठविल्यास त्यांचे स्क्रिन शॉट 9423590594 या नंबरवर उपवधु-उपवर यांच्या नावासह पाठवावे जेणेकरुन नोंद घेणे व पावती बनविणे सोईचे होईल.

**उपवधु-वराच्या ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी** QR Code

**श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर** पेयेबल अॅट सोलापूरचा डि.डि. कोणत्याही बँकेचा फॉर्म सोबत पाठवावा. नोंदणी फॉर्मच्या सोबत खालील ठिकाणी रोख स्वरुपात भरुन पावती घ्यावी. कृपया नोंदणी शुल्क मनिऑर्डरने पाठवू नये. आपला फॉर्म लवकर मिळवण्यासाठी कुरिअर/रजिस्टर पोस्टाने पाठवावा. पाकिटात रोख रक्कम पाठवू नये.

**• फॉर्म स्विकारण्याची शेवटची तारीख - दि. १५/०५/२०२६ •**

टीप : उपवधू-वर व पालकांच्या घरातील परिस्थितीची संपूर्ण माहिती काढल्याशिवाय लग्न जुळवू नका. घरी जाऊन, प्रत्यक्ष पहा म्हणजे वास्तव कळल्यानंतर पुढची बोलणी करा. येणाऱ्या काळात उप-वधूंची संख्या कमी तर उप-वरांची संख्या वाढणार आहे. तरी काळजी घ्या. उप वधू/वर व पालक परिचय मेळावा सध्याच्या काळातील गरज आहे. ह्या दृष्टीने **श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर** मेळावा ना नफा ना तोटा या तत्वावर भरवित आहे तेव्हां समाज बंधूभगिनींनी प्रसिध्द होणाऱ्या स्मरणिकेमध्ये जास्तीत जास्त जाहिराती, शुभेच्छा व देणगी देवून मेळावा यशस्वी होण्याकरिता सहकार्य करावे.

**नोंदणी फॉर्म खालील पत्यावर कुरिअर किंवा नोंदणीकृत टपालाने पाठवावे.** पत्रव्यवहाराचा पत्ता : श्री अंबरनाथ सरवदे

**विशाल ट्रेडर्स -** ६४ गुरुवार पेठ, प्लॅट नं. १०२ निर्मल हाईटस्, सोलापूर-४१३००२ मो. 9422653167 / 9422532755

### जाहिरातीचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| मुखपृष्ठ पान क्र. २ रु. २५,०००/- | मलपृष्ठ पान क्र. ३ रु. २१,०००/- | मलपृष्ठ पान क्र. ४ रु. ५०,०००/- |
| पूर्ण रंगीत पान रु. १०,०००/- | अर्धा रंगीत पान रु. ५,०००/- | पृष्ठदान - रु. १०००/- |

**लॉन मधील जाहिरातसाठी ६ X १० - १०,०००/-** व्यक्तिगत हार्दिक शुभेच्छा कलर रु. १५००/-

- आयोजकाच्या परवानगीशिवाय कार्यक्रम स्थळी कोणतेही जाहिरात (बॅनर) लावता येणार नाही.
- मेळाव्याच्या ठिकाणी स्टॉल लावण्याकरिता श्री परमेश्वर गदगे/अंबर सरवदे/मोहन काजळे यांचेशी संपर्क साधावा.
- उपवधु-वरांची माहिती ही पालकांनी दिलेली असते. याबद्दल खात्री करुन घेण्याची जबाबदारी ज्याची त्यांची आहे. • सोलापूर न्यायालयीन कक्षेत

### आपले विनित - श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर

**श्री. ज्ञानेश्वर डिंगणे - सचिव -** श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर
**मो.नं. 8605489525**

**श्री. परमेश्वर गदगे - अध्यक्ष -** श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर
**मो.नं. 9422532755**

श्री. प्रविण कापसे, श्री. अंबरनाथ सरवदे, श्री. आनंद कोंगे,
श्री. जयहरी साखरे, श्री. ज्ञानेश्वर एडके, श्री. यशवंत एकबोटे, श्री. अमरनाथ सपार, श्रीमती रत्नप्रभा चिल्लाळ, सौ. नलिनी शेंद्रे

### उपवधु-वर पालक परिचय मेळावा समिती

**श्री. सचिन तुकाराम चिल्लाळ**
**सचिव -** उपवधु-वर पालक परिचय मेळावा
**मो.नं. 9960644261**

**श्री. मोहन शंकर काजळे**
**अध्यक्ष -** उपवधु-वर पालक परिचय मेळावा
**मो.नं. 9423590594**

कै. लिलाबाई मोरोपंत झिकरे(आई) कै. कांताबाई बाळासाहेब झिकरे यांच्या स्मरणार्थ श्री. बाळासाहेब मोरोपंत झिकरे, अहमदनगर, श्री. मधुकर मोरोपंत झिकरे, सौ. पद्माबाई मधुकर झिकरे, श्री. अनिल मधुकर झिकरे, सौ. त्रिवेणी अनिल झिकरे, बडोदा यांच्या सौजन्याने पृष्ठदान. ०४

कै. सौ. वंदना विनायक भागवत यांच्या स्मरणार्थ श्री. विनायक नामदेव भागवत (डोंबिवली) यांच्या सौज्यन्याने कायमस्वरुपी पृष्ठदान ३४

॥ श्री जिव्हेश्वर प्रसन्न ॥





# श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञातीचे विठ्ठल मंदिर, सोलापूर.

श्री विठ्ठल-रुक्मिणी प्रसन्न ॥



२०, २१ बेगम पेठ, विजापूर वेस, सोलापूर - ४१३००५

आयोजित

## स्वकुळसाळी समाज उपवधू-वर पालक परिचय मेळावा २०२६

### नोंदणी फार्म

**उपवधू - वर व माहिती पत्रिका तथा नोंदणीपत्र**

रंगीत पासपोर्ट/आयकार्ड साइज २ फोटो

उपवधू/वरांचे संपूर्ण नाव : कुमारी/कुमार ____________________

वैवाहिक स्थिती : विधवा/विधुर घटस्फोटित असल्यास अपत्य : आहे/नाही

जन्म दिनांक / / जन्म ठिकाण ________ जन्म वेळ ________ उंची ________


वर्ण : गोरा/उजळ/सावळा/गव्हाळ रक्त गट : शिक्षण : ____________________

नोकरी/व्यवसाय ठिकाण ____________________

पद : ____________________ वार्षिक प्राप्ती रु. ____________________

ईमेल आयडी : ____________________ मो.नं. ____________________

जन्म कुंडली



| गोत्र | | जन्म नाव | | जन्मरास | | जन्म नक्षत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| योनी | | चरण | | नाडी | | गण | |

जन्मपत्रिका पाहणे - होय/नाही.

**ब) जोडीदाराविषयी अपेक्षा**

१) अनुरुप ____________________ गृहिणी/व्यवसायिक/नोकरदार

२) अपेक्षा वय ________ उंची ________ वर्ण ________ शिक्षण ____________________

व्यवसाय/नोकरी ____________________ मासिक प्राप्ती रु. ____________________

**क) पालकाविषयी माहिती**

पालकाचे संपूर्ण नांव ____________________ फोन नं.

पत्ता ____________________ पिन कोड नं.

वधू-वराशी नाते ____________________ व्यवसाय / नोकरी ____________________

आईचे नाव ____________________ व्यवसाय / नोकरी ____________________

**४) जोडीदाराविषयी अपेक्षा/प्रथम वर/वधू/घटस्फोटीत/विधुर**

**वरील माहिती शिवाय इतर स्पष्टीकरण/आवश्यक माहिती -** ____________________

नोंदणी शुल्क UPI/RTGS/NEFT/CASH

उपवधू-वरांससह व्यक्ती - १+२

मी (पाल्य व पालक) आम्ही वर नमूद केलेली संपूर्ण माहिती सत्य असून तिच्या सत्यतेसाठी आम्ही पूर्ण जबाबदार आहोत. अन्यथा मी/आम्ही शिक्षेस पात्र ठरेन. सोलापूर न्यायालयीन कक्षेत

**टिप - QR** कोडवर नोंदणी शुल्क पाठविल्यास त्यांचे स्क्रिन शॉट **9423590594** या नंबरवर उपवधु-उपवर यांच्या नावासह पाठवावे जेणेकरुन नोंद घेणे व पावती बनविणे सोईचे होईल.

**पावती क्र. दि.**

वधू-वराची स्वाक्षरी ____________________
नांव

पालकाची स्वाक्षरी ____________________
नांव

प्रेषक

**श्री. मोहन शंकर काजळे**

अध्यक्ष - उपवधू-वर पालक परिचय मेळावा

A 9 यशराज नगर, अक्कलकोट रोड,

सोलापूर (महा.) 413006

मो.नं. **9423590594 - 8855953011**

बुक पोस्ट

प्रति

मा. श्री. ____________________

____________________

____________________

# स्वकुल साळी ज्ञातीगृहाची नवीन कार्यकारिणी जाहीर



**आळंदी-** (विलास सरोदे यांजकडून), स्वकुळ साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी येथील विश्वस्ताची बिनविरोधपणे निवड झाल्याबाबतची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अनिल बन्सीलाल शहारे यांनी केली आहे. बिनविरोधपणे निवडून आलेल्या सर्व विश्वस्तांना आणि पदाधिकाऱ्यांना निवड झाल्याबाबतचे नियमाप्रमाणे अधिकृत प्रमाणपत्र देऊन सर्वांचा सत्कार निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अनिल बन्सीलाल शहारे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

**नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे :**

**अध्यक्ष-** अमित सूर्यकांत उगले आळंदी, जिल्हा पुणे, **उपाध्यक्ष-** श्री. मनोहर किसनराव दिवाणे आळंदी, जिल्हा पुणे, **सचिव-** श्री. देवेन पुष्पलाल क्षीरसागर-ठाणे, **सहसचिव-** श्री. दीपक बाबुराव मारवाडी-पुणे, **खजिनदार -** श्री. प्रविण प्रभाकर जुंदरे, अहिल्यानगर, **अंतर्गत हिशोब तपासणीस -** श्री. नंदकिशोर जानकीराम ढोकळे, नाशिक

**विश्वस्त** म्हणून सर्वश्री दिलीप विश्वनाथ जाळिंद्रे, मुंबई, सौ. मंगल हरीश अष्टेकर, मुंबई, ॲड. स्वाती सुरेश लंगोटे, छत्रपती संभाजी नगर, श्री. अविनाश पंढरीनाथ साळी, रायगड, श्री. अनिल दशरथ भागवत, (खेड) रत्नागिरी, श्री. मुकुंद तुकाराम साळी, चिंचवड - पुणे, श्री. विलास बाबुराव सरोदे, छत्रपती संभाजी नगर, श्री. महादेव बबनराव साळी, इचलकरंजी - कोल्हापूर, श्री. सुनील अविनाश पावले, अहिल्यानगर,

सल्लागारपदी खालील सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली ; त्यांची नावे पुढील प्रमाणे :-

सौ. स्वाती विलासराव ताटे, परळी वैजनाथ जिल्हा बीड,

श्री. विजय वामनराव ढोरजे, पुणे, श्री. अरुण विठ्ठलराव बारगजे, बीड, श्री. ज्ञानेश शशिकांत घोडके, पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर, श्री. सुरेश दत्तात्रेय इंगळे अहिल्यानगर. प्रारंभी उपस्थित असलेल्या सर्व समाज बांधवांनी जिव्हेश्वर मंदिरात जाऊन भगवान श्री जिव्हेश्वरांची मनोभावे सामूहिक आरती करण्यात आली. **निवडणूक निर्णय अधिकारी-** श्री. अनिल बन्सीलाल शहारे यांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करून कामकाजासंबंधी तपशीलवार मार्गदर्शन केले. सर्व सदस्यांनी मनापासून पारदर्शकपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले.

मावळते अध्यक्ष श्री. चंद्रकांत हावरे म्हणाले की, गेल्या दहा वर्षात सर्व पदाधिकारी आणि विश्वस्तांनी मला प्रामाणिकपणे सहकार्य केल्यामुळेच मी कामकाजात यशस्वी होऊ शकलो. त्यामुळे मी सर्व विश्वास्तांचा आणि पदाधिकाऱ्यांचा सदैव ऋणी आहे. ज्ञातिगृहात अनेक प्रकारच्या सुख - सुविधा जाणीवपूर्वक देण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रकारच्या लोककल्याणकारी योजना समाज बांधवांच्या विकासासाठी राबविलेल्या आहेत. तेव्हा या सर्व सुख - सुविधांचा लाभ समाज बांधवांनी घ्यावा असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. अशाच प्रकारचे सहकार्य करण्याची बुद्धी भगवान श्री जिव्हेश्वर तुम्हा - आम्हाला देवो हीच त्यांच्या चरणी मन :पूर्वक प्रार्थना करतो आहे. नूतन सभासदांना भविष्यात मी पूर्णपणे मनापासून

मार्गदर्शन करणार आहे असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. **श्री. अमित उगले यांची अध्यक्षपदी** बिनविरोध निवड झाल्यामुळे उगले परिवारामार्फत त्यांचा यावेळी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समाजासाठी प्रामाणिकपणे काम करण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी यावेळी केल्या.

स्वकुळ साळी ज्ञातिगृहाचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. उच्चतम विकसित समाज निर्माण करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना लागू करण्यात येणार असल्याचे नूतन अध्यक्ष श्री. अमित उगले यांनी सांगितले आहे.

उपाध्यक्ष श्री. मनोहर दिवाणे यांनी देखील समाज बांधवांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सचिव श्री. देवेन क्षीरसागर यांनी केले. सदर कार्यक्रम ज्ञातिगृहाच्या सभागृहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास **अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष डॉ. अशोक दांडेकर, सरचिटणीस श्री. भालचंद्र साळी, सल्लागार श्री. सुरेश लंगोटे, साळी समाज इतिहास संशोधन मंडळाचे प्रमुख श्री. डी.जी. निमकर** आदि बहुसंख्य समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व समाज बांधवांनी प्रीतीभोजनाचा आस्वाद घेतला.

**वृत्त-** विलास सरोदे, छत्रपती संभाजी नगर
९४२१४३१७३३/९५१८३६१७००

## भोपाल साळी समाज की महिला मंडल का मथुरा वृन्दावन भ्रमण




भोपाल साळी समाज की महिला मंडल द्वारा दिनांक २६ मार्च २०२६ से ३० मार्च २०२६ तक पहली बार भोपाल शहर से बाहर कृष्ण भूमि मथुरा वृन्दावन का भ्रमण किया गया । यात्रा हेतु दिनांक २६ मार्च २०२६ को रेलवे से प्रस्थान किया गया । दिनांक २७ मार्च २०२६ को मथुरा पहुंच कर सभी महिलाओं को होटल में स्टे कराया गया । समाज के द्वारा इस आयोजन की जिम्मेदारी समाज की उपाध्यक्षा श्रीमती छाया पाटेकर को सौंपी गई जिसे उन्होंने स्वीकार कर बखूबीसे निभायी. इस भ्रमण में समाज की **अध्यक्षा श्रीमती मंदा लांडगे, समाज की उपाध्यक्षा श्रीमती छाया पाटेकर**, श्रीमती निशा वाव्हळ, श्रीमती प्रभा शेरे, समाज की **सक्रिय सदस्या श्रीमती कलावती वाव्हळ, श्रीमती कविता धडकर, श्रीमती ललिता कावलकर, श्रीमती आशा लोथे** ने उत्साहपूर्वक भाग लिया । सभी महिलाओं ने मथुरा वृन्दावन में सभी प्रसिद्ध मंदिरों के दर्शन लाभ लिये और वहा के फेमस व्यंजनो का आनंद लिया । भगवान श्रीकृष्ण की पावन भूमि पर सभी महिलाऐ वहां की पवित्र मिट्टी के स्पर्श से भाव विभोर हुए और वहां के श्रीकृष्णमय वातावरण में राधे - राधे भक्तिमय भाव को स्वयं अनुभव किया। समाज की सभी भाग लेने वाली महिलाओं ने रेलवे यात्रा का भरपूर आनंद लिया। यात्रा की वापसी दिनांक ३० मार्च २०२६ को हुई । यात्रा बहुत सुखद और सफल रही। सभी महिलाओं ने समाज की उपाध्यक्षा श्रीमती छाया पाटेकर का यात्रा आयोजित करने में महत्त्वपूर्ण भूमिका निभाने के लिए सराहना करते हुए हृदय से आभार व्यक्त किया । मथुरा वृन्दावन के आनंदोत्सव भ्रमण की झलकियां फोटो यहां पोस्ट किए जा रहे हैं ।

**वृत्त - श्री अभय पाटेकर, भोपाळ**

०७
कै. केशवराव मलकाजी धोत्रे, मुंबई यांच्या स्मरणार्थ
श्री. गुरुनाथ मलकाजी धोत्रे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

३८
कै. द्वारकाबाई शामराव वैद्य (काळमेख) यांचे स्मरणार्थ
श्री. व सौ. सुनंदा अभिमन्यु वैद्य (नाशिक) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# जागतिक महिला दिन सोहळा २०२६ बडोदा अहवाल



दरवर्षाच्या उपक्रमाप्रमाणे यावर्षी पण ८ मार्च 202६ रविवार रोजी श्री स्वकुळ साळी समाज बडोदा महिला मंडळ द्वारा जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. **प्रमुख पाहुणे सौ. भाग्यश्री राणा साळी, अध्यक्षा सौ भारतीताई चौधरी, उपाध्यक्ष सुरेखाताई साळी, सेक्रेटरी सौ मनीषा डंबरे, खजानची सौ रेखा दिवाने** तसेच अन्य मंचस्त महानुभाव द्वारा कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रम सुरू करण्यात आला .

कु. धरणी देवकरने सुंदर स्वागत नृत्य सादर केले. सौ रेखा दिवाने, सौ नंदिनी दिवाने आणि दिशा साळी यांनी सुंदर प्रार्थना सादर केली .

कार्यक्रम दरम्यान मंचस्त महानुभावाचे सन्मान करण्यात आले, तसेच उपस्थित पाहुणे यांचेही सन्मान करण्यात आले. महिला मंडळाचे अध्यक्ष सौ भारती ताई चौधरी यांनी प्रासंगिक संबोधन केले. तसेच प्रमुख पाहुणे सौ. भाग्यश्री राणा साळी यांनी सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, तसेच माता जिजाऊ यांच्या संदर्भ घेऊन सुंदर व मार्मिक वक्तव्य केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सौ विद्या केकाने श्री प्रशांत केकाने यांना प्रथम कन्यारत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले .

महिला मंडळाचे अध्यक्ष भारतीताई चौधरी यांनी उपस्थित सर्व देणगीदारांचे आभार व्यक्त करून असाच सहकार नेहमी द्यावा. अशी आशा व्यक्त केली. श्री अशोक लाढे तसेच श्री प्रवीण दिवाने यांना सौ अनिता दिवटे तसेच साधना लांबोळे यांनी पुष्पगुच्छ व गिफ्ट देऊन निवृत्ती सन्मान करण्यात आला होता .

सौ दिपाली चौधरी यांनीसुद्धा महिला दिवस विषयी संबोधन केले. सौ पूजा चौधरी, कुमारी अपूर्वा चौधरी, कुमारी धरणी देवकर आणि चि. शिव चौधरी या सर्वांनी खूपच सुंदर डान्स परफॉर्मन्स केले .

उपस्थित सर्व समाज बंधू-भगिनी बाळ गोपाळ यांनी टाळ्यांच्या गजराने त्यांना प्रोत्साहित केले होते सौ वर्षा संजय जरीवाला तसेच सौ रेखा प्रवीण दिवाने यांनी परफॉर्मन्स करणाऱ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहित केले होते.

सौ मनीषा डंबरे आणि कुमारी दिशा किशोर साळी यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळून खूपच सुंदर अँकरिंग केले होते. श्रीमती सुरेखाताई साळी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. सर्वात शेवटी सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला . आणि कार्यक्रम समाप्तीची घोषणा केली

**वृतांकन :** सौ भारती चौधरी (महिला मंडळ अध्यक्ष)
सौ मनीषा डंबरे (महिला मंडळ सेक्रेटरी)



## भावपूर्ण श्रद्धांजली

घाटकोपर येथील जेष्ठ समाज बांधव व भारतीय पोस्टखात्यातील सेवा निवृत्त अधिकारी व श्री. संदिप नंदलाल धरम यांचे वडील कै. श्री. नंदलाल खुशाल धरम यांचे वृद्धापकाळाने बुधवार दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता निधन झाले. ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परीवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.



कै. महादेव बाळा दुर्गुळे व कै. सदानंद महादेव दुर्गुळे, कुडली यांचे स्मरणार्थ
सौ. शारदा सदानंद दुर्गुळे व श्री. महेश सदानंद दुर्गुळे (भिवंडी) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# येणारा काळ अविवाहितेचे युग ठरणार आहे का? भविष्यातील एक गंभीर समस्या...

अलीकडील एका आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणानुसार पुढील सहा वर्षांत जगातील सुमारे ४५% मुली अविवाहित राहू शकतात. ही माहिती १ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या लोकमत वृत्तपत्रात प्रकाशित झाली होती,जी मॉर्गन स्टॅन्ली संस्थेच्या सविस्तर अभ्यासावर आधारित आहे.

**सर्वेक्षणात आढळलेली प्रमुख कारणे :-**

१.आजच्या मुली उच्च शिक्षण घेत आहेत आणि करिअरला प्राधान्य देत आहेत.

२.त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत आणि कोणावर अवलंबून राहू इच्छित नाहीत.

३.त्यांना स्वातंत्र्य प्रिय आहे आणि त्या स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला इच्छुक आहेत.

४.विवाह, मातृत्व आणि कौटुंबिक बंधने ही त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरतात असे त्यांना वाटू लागले आहे.

५. ही प्रवृत्ती कायम राहिली तर पारंपरिक कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक रचना ढासळू शकते.

६. लोकसंख्या घट, अविवाहित मुलांच्या संखेत वाढ आणि वृद्धावस्थेत एकटेपणाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

७. शेवटी प्रश्न उरतो प्रगती, पद आणि पैसा याचा उपयोग काय, जर आयुष्याच्या शेवटी साथ देणारा कोणीच नसेल तर... ?

अनेक पालक मुलींसाठी संबंध शोधत आहेत,पण मुलींनाच विवाहात रस नसल्यामुळे प्रत्येक प्रस्ताव नाकारला जात आहे. समाजातील मोठ्या घटकाला या बदलाची गंभीरता अजून समजलेली नाही,म्हणून वेळेवर जागे होणे आवश्यक आहे. मुलींच्या विवाहासाठी योग्य वय २३ ते २६ वर्षे मानले जाते; शक्य असल्यास त्याहीपेक्षा लवकर. यासाठी सामूहिक पातळीवर जागरूकता आणि प्रयत्न गरजेचे आहेत. हा विषय कोणाच्या विरोधात नसून,भविष्यातील स्थैर्य आणि संतुलनाच्या चिंतेतून मांडला आहे. समाज, कुटुंब आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल राखणे हीच खरी प्रगती आहे.

---




## ।।शुभविवाह सोहळा।।

**चि. सौ. का. अश्विनी**
B.Sc. (Chemistry)
श्री. गोपाळ सुकलाल कासटकर यांची नात
श्रीमती रत्नाबाई व स्व. सुनिल त्र्यंबक डहाके
यांची द्वितीय सुकन्या रा. पारोळा जि. जळगांव

**चि. प्रसाद**
B.E. (Civil Engineer)
श्रीमती शकुंतला माधवराव कांबळे यांचे नातू
सौ. अलका व श्री. भरत मधुकरराव कांबळे
यांचे चिरंजीव रा. कोपरगांव जि. अहिल्यानगर

**✦ यांचा शुभविवाह ✦**

मिती-वैशाख शु।।१२, शके १९४८ मंगळवार दि. २८/४/२०२६ रोजी स्टॅ. टा. दुपारी १२.३२ वा. विवाह लोढा मंगल कार्यालय कोपरगांव जि. अहिल्यानगर येथे संपन्न झाला.

**विवाहप्रसंगी सर्व समाजबांधव व आप्तेष्ट नवदांपत्यास आशिर्वाद देण्यासाठी उपस्थित होते.**

**कांबळे, साकरे, वैद्य, काळे, धरम, जंत्रे, हेडाऊ, बारडोलीवाला, नायकुडे, जगताप, चित्तेवान, भोई, चौधरी, निकम, डहाके, खर्डेकर, दिवटे, भोगरे, कासटकर परिवार**

**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे नवविवाहित दांपत्यास भावी आयुष्यासाठी शुभेच्छा.**

कै. सौ. सखुबाई मारुतीराव ठाणेकर (आई) व कै. श्री. मारुतीराव गणपती ठाणेकर यांच्या स्मरणार्थ श्री. मधुकरराव मारुतीराव ठाणेकर, कुळगांव-बदलापूर यांच्या सौजन्याने पृष्ठदान सन्माननिय हितचिंतक ०९

कै. सौ. मिनाक्षी चंद्रकांत हावरे व कै. श्री. राहुल चंद्रकांत हावरे यांचे स्मरणार्थ श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, मुंबई-नाहुर (पूर्व) यांच्या सौजन्याने पृष्ठदान. ४०

# अवयवदान

"मॅडम, फुकटचे पैसे नकोत, गजरा घ्या... आज माझा "दुसरा वाढदिवस" आहे!" सिग्नलवरच्या पोराचे शब्द ऐकून एसी कारमध्ये बसलेल्या करोडपती आईने थेट रस्त्यावरच हंबरडा फोडला!

पुण्यातील चांदणी चौकातील सिग्नलवर दुपारच्या कडक उन्हात गाड्यांची रांग लागली होती. एका आलिशान "ऑडी" (Audi) कारमध्ये ३५ वर्षांच्या "अनुराधा" डोळ्यांवर गॉगल लावून बसल्या होत्या. पण त्या गॉगलच्या आतून त्यांचे डोळे सतत रडत होते. आज "१५ एप्रिल". बरोबर तीन वर्षांपूर्वी याच दिवशी अनुराधा यांचा ७ वर्षांचा एकुलता एक मुलगा, "अंश" एका भयंकर अपघातात त्यांना सोडून गेला होता. अंश "ब्रेन डेड" (Berain Dead) झाला होता, आणि एका धाडसी निर्णयापोटी अनुराधा आणि त्यांच्या पतीने अंशचे सर्व अवयव (Oergans) दान केले होते. आज अंशचा स्मृतिदिन होता. अनुराधा अत्यंत निराश अवस्थेत अनाथश्रमात देणगी देऊन घरी परतत होत्या.

तो सिग्नलवरचा प्रसंग आणि एक १० वर्षांचा मुलगा: सिग्नल लाल झाला. उन्हाच्या झळा लागत होत्या. तेवढ्यात एक १०-११ वर्षांचा, घामाने डबडबलेला पण अत्यंत गोड चेहऱ्याचा मुलगा अनुराधा यांच्या कारच्या काचेवर टकटक करू लागला. त्याच्या एका हातात मोगऱ्याचे गजरे होते आणि दुसऱ्या हातात पाण्याचा रिकामा ग्लास. अनुराधा यांना भयंकर चिडचिड झाली. त्यांनी रागाने काच थोडी खाली केली आणि पर्समधून "५०/- रुपयांची" नोट काढून त्याच्या अंगावर फेकत म्हणाल्या, "हे घे पैसे आणि जा इथून! मला कोणताही गजरा नकोय, आणि मला कुणाशीही बोलायचं नाहीये." पण त्या मुलाने ती ५०/- ची नोट उचलली नाही. तो अत्यंत स्वाभिमानाने काचेजवळ आला आणि म्हणाला, "मॅडम, माझी आई म्हणते की फुकटचे पैसे कधीही घेऊ नयेत, त्याने पाप लागतं. मी भिकारी नाहीये, तुम्ही एक गजरा घ्या, मगच मी हे ५० रुपये घेईन."

त्याच्या आवाजातील निरागसपणाने अनुराधा यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी डोळ्यांवरचा गॉगल काढला आणि त्या मुलाकडे पाहिले. त्याचा चेहरा खूप शांत आणि हसरा होता.

अनुराधा यांनी विचारले, "एवढ्या उन्हात तू गजरे का विकतोयस? शाळा नाहीये का तुझी?" तो सत्याचा स्फोट आणि अश्रूंचा बांध फुटलेला क्षण: मुलगा गोड हसून म्हणाला, "शाळा सकाळची असते मॅडम. पण माझी आई लोकांची धुणी-भांडी करते. माझ्या आईवर खूप मोठं कर्ज आहे, म्हणून मी तिला मदत करतो. आणि तसंही मॅडम. आज माझा "दुसरा वाढदिवस" आहे!" अनुराधा यांना काहीच समजले नाही. "दुसरा वाढदिवस? म्हणजे काय?" मुलगा शर्टाची कॉलर थोडी बाजूला करत छातीवरची एक मोठी "सर्जरीची खूण" (Opeeration Maerk) दाखवत म्हणाला, "मॅडम, तीन वर्षांपूर्वी माझ्या हृदयात भोक होतं. डॉक्टर म्हणाले होते मी मरणार! माझ्या आईने कर्ज काढून मला पुण्याला "सह्याद्री हॉस्पिटलमध्ये" आणलं होतं. पण मला कोणीतरी देवदूत भेटला! बरोबर तीन वर्षांपूर्वी, "१५ एप्रिलला" एका लहान मुलाचा अपघात झाला होता... आणि मॅडम... त्या मुलाचं धडधडणारं "हृदय" (Heaert) डॉक्टरांनी माझ्या छातीत बसवलं! त्या देवासारख्या मुलाने मला जीवन दिलं, म्हणून आज माझा दुसरा जन्मदिवस आहे!" हे शब्द ऐकताच अनुराधा यांच्या पायाखालची जमीनच सरकली! त्यांचा श्वास अक्षरशः कोंडला गेला! "सह्याद्री हॉस्पिटल", "१५ एप्रिल" आणि "हृदय प्रत्यारोपण" अनुराधा यांनी थरथरत्या आवाजात विचारले, "बाळा... तुझं नाव काय आहे?" मुलगा म्हणाला, "माझं नाव कबीर आहे मॅडम."

काळजाला भिडणारा क्लायमॅक्स: अनुराधा यांनी स्वत:च्या डोक्याला हात लावला. तीन वर्षांपूर्वी त्यांनी स्वत:च्या अंशचे हृदय ज्या "कबीर" नावाच्या गरीब मुलाला दान केले होते... तोच कबीर आज त्यांच्या गाडीसमोर उभा होता!



**कै. सौ. सिंधुताई खंडु कापरे व कै. श्री. खंडु चिंतामणी कापरे यांच्या स्मरणार्थ श्री. महेश खंडु कापरे (कल्याण) व सौ. संगिता कापरे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

अनुराधा वेड्यासारख्या गाडीचा दरवाजा उघडून भररस्त्यात खाली उतरल्या. त्यांनी त्या घामाने डबडबलेल्या कबीरला दोन्ही हातांनी घट्ट धरले. त्यांच्या डोळ्यांतून धाय मोकलून अश्रू वाहत होते.

"कबीर... बाळा, मला फक्त एक गोष्ट करू दे..." असे म्हणत अनुराधा यांनी आपले कान आणि डोके कबीरच्या छातीवर ठेवले. धड-धड... धड-धड... त्या गरीब मुलाच्या छातीत आज अनुराधा यांच्याच पोटच्या गोळ्याचे, त्यांच्या "अंशचे" हृदय धडधडत होते! ज्या हृदयाचे ठोके तीन वर्षांपूर्वी थांबलेत असे त्यांना वाटले होते, ते ठोके आज या रस्त्यावर एका स्वाभिमानी मुलाच्या छातीत जिवंत होते!

अनुराधा भररस्त्यात गुडघ्यावर बसून ढसाढसा रडू लागल्या. त्यांनी कबीरला घट्ट मिठी मारली. सिग्नल हिरवा झाला होता, गाड्यांचे हॉर्न वाजत होते, पण एका आईला आज तिचा हरवलेला देवदूत परत मिळाला होता!

त्याच दिवशी अनुराधा यांनी कबीरच्या आईला शोधून काढले. त्यांच्या डोक्यावरचे हॉस्पिटलचे संपूर्ण कर्ज एका झटक्यात फेडून टाकले आणि कबीरच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घेतली. कारण एका करोडपती आईचा "अंश" आज एका गरीब पण स्वाभिमानी पोराच्या रूपात जिवंत होता!

पैशाचा माज विसरायला लावणारी आणि अवयवदानाचा (Oergan Donation) एक अत्यंत पवित्र संदेश देणारी ही डोळ्यांत पाणी आणणारी सत्यकथा.

**संकलीत मिताली साळी**

## शोभायात्रा, डोंबिवली साळी समाज २०२६



गुढीपाडव्यानिमित्त गणेश मंदिर मंडळातर्फे हिंदू धर्माचे नववर्ष स्वागत यात्रा म्हणजेच शोभा यात्रेचे आयोजन केले जाते यात अनेक संस्था, समाज प्रबोधन करणारे बॅनर, आपले ढोल पथक, लेझीम, पालखी किंवा वेशभूषा परिधान करून सकाळी सात वाजता मोठ्या उत्साहाने मैदानात हजर असतात, डोंबिवली साळी समाज आपला पारंपारिक वेशभूषा म्हणजेच खादी टोपी, झब्बा तसेच महिला नववारीत नटून-थटून मोठ्या संख्येने उत्साहात हजर होत्या व ग्रुप फोटोही काढत होत्या, डोंबिवली शहराचे तसे तीन-चारच सण, गुढीपाडवा, गणेशोत्सव, भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव आणि दसरा सण मोठ्या उत्साहात साजरे होतात. डोंबिवलीची शान म्हणजे फडके रोड, तरुणाई या दिवशी छान छान कपडे घालून पहाटे एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी हजर असतात. डोंबिवली साळी समाजाचे आपले आद्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांची पालखी छान सजवून आणली होती. अध्यक्ष श्री पंकज व सौ स्नेहा साळी तसेच श्री राजेश व सौ सुनीता साळी, सौ मनीषा व प्रवीण दिवटे, श्री व सौ भूषण कोळेकर श्री ईश्वरलाल (फंड) श्री विजय धांडे, रेखा दिवटे, श्री सोमनाथ कासटकर आदी उपस्थित होते, शोभायात्रेचा सर्वप्रथम मान गणपती मंदिर, यांची पालखी व प्रमुख पाहुणे यांचा मान असतो पालखीला नारळ वाहवून शोभायात्रेची सुरुवात होते. शोभायात्रेची झाकी पाहण्यासाठी चौका चौकात प्रचंड गर्दी होते, सोबत चॅनलची ही बाईट घेण्यासाठी मोठी गर्दी असते. वातावरण एकदम जल्लोषपूर्ण, उत्साहपूर्ण, आपले हे सण साजरे करण्यासाठी तमाम डोंबिवलीकर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिव्हेश्वरचा जयघोष करत शोभायात्रा बाजीप्रभू चौकात संपन्न झाली.

**सचिव, सौ. सुनीता साळी, डोंबिवली समाज**

११ कै. मालिनी श्रीकृष्ण साळी (भूतकर) व कै. श्रीकृष्ण नथुराव साळी (सर) यांचे स्मरणार्थ श्री. राहूल श्रीकृष्ण साळी, पवई - मुंबई यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

४८ कै. श्री. श्रीकृष्ण नथ्थुराव साळी (भुतकर) यांचे स्मरणार्थ श्री. राहूल श्रीकृष्ण साळी (पवई) यांच्या सौजन्याने पृष्ठदान सन्माननिय हितचिंतक

# संकल्प आभासी सभा संपन्न 10 वी, 12 वी नंतर पुढे काय ?




संकल्प फाउंडेशनच्या १५ व्या वर्धापन दिना निमित्त रविवार दि. ५ एप्रिल २०२६ रोजी मान्यवर व्याख्याते, विद्यार्थी व समाज बंधू भगिनी यांचे उपस्थितीत आभासी बैठक संपन्न झाली . प्रमुख वक्ते प्राचार्य मनोज दिंडे यांनी इयत्ता नववी पासून अभ्यास कसा करावा, परीक्षा दडपण व दहावी बारावीनंतरच्या अनेक अभ्यासक्रमाबाबतची माहिती दिली. इयत्ता बारावी नंतर होणाऱ्या सर्व प्रवेश परीक्षांची सविस्तर माहिती देऊन यासाठी काय करावे लागेल हे देखील सांगितले. कोणतेही क्षेत्र लहान किंवा मोठे नसून आपली आवड आणि त्यात पारंगतता यातच यश असल्याचे सांगितले.

दुसऱ्या वक्त्या सौ.सुरेखा खोकले यांनी अभ्यासक्रमाचे नियोजन व प्रत्यक्षात मुलांकडून होणाऱ्या कृती याबाबत सविस्तर माहिती दिली. परीक्षा देताना वेळेच्या नियोजन बाबतची माहिती सांगितली. उपस्थित विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी त्यांच्या मनातील प्रश्न विचारले. त्यास वक्त्यांनी सविस्तर उत्तरे दिलीत. संकल्प फाउंडेशनच्या विविध उपक्रमांचे सर्वांनीच अभिनंदन व कौतुक केले, असेच उपक्रम वारंवार सुरू असावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

सभेचे प्रास्ताविक संकल्प फाउंडेशनचे संस्थापक प्रा. सुभाष अढाव यांनी केले व स्थापनेपासून करीत असलेल्या कार्याची माहिती दिली. अजूनही बरीच कामे करावयाची असल्याचे सांगितले.

आजच्या सभेसाठी संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती, सेवानिवृत्त सहाय्यक कुल सचिव श्री संजय एरंडे, जळगाव जिल्हा ज्यूकटो, संघटना अध्यक्ष नंदन वडिकार, ठाणे महिला मंडळ अध्यक्ष सौ. सुनीता पांढरपट्टे, संकल्पचे ज्येष्ठ मार्गदर्शक जगन्नाथ येलगट यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

सभेच्या यशस्वीतेसाठी नरेंद्र गायकवाड, संजय सातपुते, भारती एलगट, मंगल पवार, नंदना लोखंडे, स्वाती, अनघा वाखारकर - अढाव, अश्विनी चोपारे - अढाव, गणेश पारणकार, पूजा रोडे, शेखर सव्वाशेरे, श्रावणी, शौर्य लोणकर, तसेच अन्य बंधू-भगिनी यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संकल्प फाउंडेशनचे संस्थापक प्रा सुभाष अढाव यांनी केले.

---

**जिवंत असताना छळले त्यांना**
**किंमत ना कळली त्यांची**
**येतील का ते परतून आता**
**पुण्यतिथी करतो ज्यांची**

**जेव्हा होते हयात पूर्वज**
**आवड त्यांची ना कळली**
**घरात एका राहून देखील**
**मनं मनाशी ना जुळली**

**वृद्ध जीवांची अडचण होती**
**भासत सर्वांना तेव्हा**
**मायेचा तो शब्दही नव्हता**
**मुखातून पडला कधी**

**केवळ परंपरा ती म्हणुनी**
**आज आठवण त्यांची झाली**
**छपरावरती अन्न ठेवता**
**कर्तव्यातून सुटका झाली**

# संगमनेरात स्वकुळ साळी समाजाच्या वतीने भगवान श्री गणेश विग्रह प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

## १ ते ३ मे दरम्यान त्रिदिवसीय धार्मिक उत्सवाचे आयोजन

**संगमनेर**: येथील रंगारगल्लीतील ऐतिहासिक अशा श्री लक्ष्मीनारायण मंदिराचा जिर्णोध्दार आणि भगवान श्री जिव्हेश्वर प्राणप्रतिष्ठा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाल्यानंतर, आता स्वकुळ साळी समाज व श्री लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टच्या वतीने भगवान श्री गणेश विग्रह प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा १ मे ते ३ मे २०२६ या कालावधीत संपन्न होणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष वैभव ढोरे व प्रकल्प प्रमुख भारतशेठ भागवत यांनी दिली आहे.

सोहळ्याची सुरुवात शुक्रवार, दि. १ मे रोजी सकाळी ९.०० वाजता भगवान श्री गणेशाच्या भव्य शोभायात्रेने होईल. ही शोभायात्रा श्री लक्ष्मीनारायण मंदिर, नगरपालिका, गांधी चौक, रंगार गल्ली या मार्गे मार्गक्रमण करून पुन्हा मंदिरात येईल. या धार्मिक विधींचे मुख्य पुरोहित म्हणून नाशिक येथील प्रसिद्ध शास्त्रशुद्ध मार्गदर्शक डॉ. गणेश जोशी गुरुजी व त्यांचे सहकारी ब्रह्मवृंद काम पाहणार आहेत. या पूजेचे यजमानपद मुंबई येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती शांताबाई जंत्रे भूषवणार आहेत.

शनिवार, दि. २ मे रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत श्री गणेश याग व धार्मिक विधी पार पडतील. या दिवशी सायंकाळी ६.३० वाजता संगमनेरच्या सुकन्या व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मा. सौ. निलम प्रशांत वाव्हळ (DYSP, ठाणे ग्रामीण) यांचे महिला, युवक आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी ९.०० ते १२.३० या वेळेत मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना व पूर्णाहुती होईल. सायंकाळी ६.०० वाजता महाआरती झाल्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यासाठी राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. यामध्ये:

डॉ. मैथिली सत्यजीत तांबे (नगराध्यक्ष, संगमनेर), मा. बालाजीराव कांबळे (अध्यक्ष, अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज, तेलंगणा), उदय दुधाने (उद्योगपती, कोल्हापूर), डॉ. संजयजी मालपाणी (कार्याध्यक्ष, गीता परिवार), मा. श्री. व्यंकटेश मोहनराव धोत्रे( चीफ सेक्रेटरी , एज्युकेशन तेलंगणा राज्य) मा. श्री.अविनाश पुरे (उपजिल्हाधिकारी, धुळे) , मा. सौ. नीलम प्रशांत वाव्हळ ,कल्याण (डी. वाय .एस .पी .ठाणे ग्रामीण ),मा.सौ अश्विनी भरत मते( नगरसेविका, मुंबई महानगरपालिका) मा. श्रीम.शोभाताई दिलीप सोनारे, पैठण (मा .नगराध्यक्ष पैठण नगरपरिषद) मा. श्री. विशाल किसनराव साळी वडगाव शेरी (नगरसेवक, पुणे महानगरपालिका) मा. श्री. दीपक सोपानराव अरबूणे ,कराड (प्रथितयश उद्योजक), मा. श्री. शिरीष प्रभाकरराव जठार , नारायणगाव (प्रथितयश उद्योजक) मा. श्री. उमेश शामसुंदर वाव्हळ (निवृत्त पोलीस निरीक्षक ,कल्याण), मा. श्री दिलीप पोरे (अध्यक्ष, स्वकुळ साळी समाज, ईश्वरपूर, जि. सांगली) येथील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख भारत शेठ भागवत ,अध्यक्ष वैभव ढोरे व सर्व समस्त विश्वस्त मंडळ तसेच प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे सन्माननीय सदस्य, स्वकुळ साळी महिला मंडळ, युवक मंडळ व समस्त विश्वस्त मंडळ परिश्रम घेत आहेत. या त्रिदिवसीय सोहळ्यास समस्त सर्व समाज बांधवांनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन श्री लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

**संगमनेर प्रतिनीधी**

कै. रामदास भावडु सिताफळे व कै. श्रीमती सखुबाई रामदास सिताफळे (नशिराबाद) यांच्या स्मरणार्थ श्री. बारसु रामदास सिताफळे व सौ. मिरा बारसु सिताफळे (डोंबिवली) यांच्या सौजन्याने पृष्ठदान १३

# सकाळी रिकाम्या पोटी काय खावे?

आपण रात्रभर निवांत झोपतो. झोपेत शरीर खराब झालेल्या पेशी दुरुस्त करते. नवीन पेशी तयार होतात आणि स्नायूंची झीज भरून काढली जाते.लिव्हर आणि किडनी शरीरातील विषारी घटक, toxins फिल्टर करण्याचे काम वेगाने करतात. हे घटक रक्ताद्वारे मूत्राशयाकडे पाठवले जातात.आपण श्वासोच्छवास आणि घामावाटे रात्रभर पाणी गमावतो.

त्यामुळे सकाळी उठल्यावर शरीर नैसर्गिकरित्या “डिहायड्रेटेड” झालेले असते तरी सकाळी लवकर ५ ते ७ दरम्यान उठणे ही दिवसाची खरी सुरुवात आहे. सकाळी उठल्या उठल्या रिकाम्या पोटी दोन ग्लास, अंदाजे ५०० मिली साधे पाणी प्यावे. यामुळे आतड्यांची स्वच्छता - रात्री जमा झालेले विषारी घटक (Toxins) बाहेर काढण्यासाठी पाणी मदत करते. यामुळे सकाळी पोट साफ होण्यास (Bowel movement) मदत होते.

**मेटाबॉलिझम बूस्ट** - सकाळी रिकाम्या पोटी पाणी प्यायल्याने चयापचय क्रिया २४-३० टक्क्यांपर्यंत वाढते, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**रक्त शुद्धीकरण** - पाणी प्यायल्याने रक्तातील विषारी घटक लघवीवाटे बाहेर पडतात, ज्यामुळे नवीन रक्तपेशी तयार होण्याची प्रक्रिया जलद होते.

**त्वचेची चमक** - शरीरात पाणी गेल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि त्वचा सतेज (Glow) होते. पाणी नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे

**मेंदूची कार्यक्षमता** - मेंदूचा ७०% भाग पाणी आहे. सकाळी पाणी मिळाल्याने, रिहायड्रेशन झाल्याने थकवा आणि डोकेदुखी दूर होऊन एकाग्रता वाढते. मेंदू ताजातवाना होतो.

यानंतर बाहेर १०-३० मिनिटे सूर्यप्रकाश घ्या. सोबत ५-१० मिनिटे स्ट्रेचिंग, चालणे किंवा हलका व्यायाम करा. सकाळच्या सूर्यप्रकाशामुळे आपला Ciercadian Rhythm रिसेट होतो. रक्तप्रवाह वाढतो, स्नायू जागृत होतात, मूड हॅप्पी हार्मोन्सने भरतो आणि दिवसभर ऊर्जा टिकते. रात्री छान झोप येते.

सकाळी पाणी पिल्यानंतर लगेच नाश्ता करू नका. २०-३० मिनिटे वाट बघा, जेणेकरून शरीर हे पाणी चांगले शोषून घेईल आणि मेटाबॉलिझम बूस्ट पूर्ण होईल. ब्रश करा व जिभेची स्वच्छता करून घ्या.

सकाळी उठल्यानंतर पहिले ४५-६० मिनिटे मोबाइल पूर्ण टाळा. मन शांत ठेवा. युनिव्हर्सवर, निसर्गावर किंवा ईश्वराप्रती कृतज्ञता व्यक्त करा, आभार व्यक्त करा.

**रिकाम्या पोटी काय खावे-** एक छोटे फळ - केळी, पपया, पेरू, सफरचंद, बेरीज किंवा संत्री ५-१० भिजवलेले बदाम, अक्रोड, नट्स ३०-४५ मिनिटांनंतरचा मुख्य नाश्ता- भरपेट करा. मुग/ मटकी/चना/चवळी. ची उसळ पोहे- भरपूर भाज्या व बीन्स घातलेले उपमा- भाज्या, डाळी, नट्स, हर्ब्स टाकलेला स्मूदी – हिरवी पाने, फळे, अळशी, थोड आले/हळद, आपल्या आवडीचे प्रकृतीप्रमाणे पोळी भाजी

सकाळी जास्त कॅलरी घेतल्यास ते चांगले पचते. दिवसभर भूक नियंत्रिते राहते, रक्तसाखर स्थिर राहते आणि ऊर्जा टिकते.

**रिकाम्या पोटी काय टाळावे :-** कॉफी किंवा ब्लॅक टी- रिकाम्या पोटी कॅफीन घेतल्यास नैसर्गिक कोर्टिसोल हार्मोन अनावश्यक वाढते, ज्यामुळे नंतर थकवा आणि चिडचिड वाढू शकते. एसिडिटी सुद्धा वाढते

फळांचा ज्यूस, साखरयुक्त पेय किंवा कोल्ड ड्रिंक्स . रक्तातील साखर एकदम वाढते आणि नंतर एनर्जी क्रॅश होते.

ब्रेड, बिस्कीट, पाव, जड, तेलकट किंवा प्रोसेस्ड अन्न खाल्याने पचन बिघडू शकते.

सकाळी नैसर्गिक कार्टिसोल जास्त असते; त्यात कॅफीन घातल्यास नंतर थकवा आणि चिडचिड वाढते. कॅफीन नाश्ता केल्यावर १ तासानंतर घ्या (ग्रीन टी उत्तम). निरोगी आणि उत्साही दिवसासाठी चांगली सुरुवात करा!

साधे पाणी प्या! राजा महाराजा सारखा नाष्टा करा.! सकाळ चांगली तर दिवस अप्रतिम!

**संकलीत श्री. ईश्वरलाल साळी डोंबिवली**

# उपकाराची परतफेड

आई, तू या घरात फुकट जेवतेस आणि राहतेस!

बावीस लाखांचे दागिने देऊनही पोराने जेवताना आईचा अपमान केला... पण दुसऱ्या दिवशी आईने असा 'गेम' फिरवला की करोडपती लेकाने थेट आईचे पाय धरले!

नागपूरच्या धरमपेठ भागात ६२ वर्षांच्या "अनुराधाताई" (अनुताई) राहत होत्या. त्या एका शाळेतून मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पतीचे खूप आधीच निधन झाले होते. अनुताईंनी एकट्याने स्वत:च्या अंगावर खस्ता खाऊन आपला एकुलता एक मुलगा, सौरभ याला एमबीए (MBA) पर्यंत शिकवले होते. सौरभला स्वत:चा "ऑरेंज एक्सपोर्ट" आणि "कोल्ड स्टोरेज" (संत्री निर्यात) चा मोठा बिझनेस सुरू करायचा होता. पण बँकेकडून पुरेसे कर्ज मिळत नव्हते. मुलाचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून अनुताईंनी स्वत:च्या रिटायरमेंटचे ३० लाख रुपये आणि स्वत:च्या अंगावरचे २२ लाखांचे सोन्याचे दागिने (मंगळसूत्र आणि पाटल्या) विकून सौरभच्या हातात दिले. वर्धा रोडवर सौरभचा बिझनेस थाटात सुरू झाला. त्याची बायको, "मिताली" हिलाही नवऱ्याच्या या यशाचा भयंकर गर्व झाला होता.

तो अपमानाचा प्रसंग आणि अन्नावरून काढलेली लायकी : बिझनेसला दोन वर्षे पूर्ण झाली. सौरभला आता बिझनेस वाढवण्यासाठी आणि नवीन ट्रक्स घेण्यासाठी आणखी पैशांची गरज होती. त्याची नजर अनुताईंच्या "पोस्ट ऑफिसमध्ये" असलेल्या शेवटच्या २५ लाखांच्या फिक्स डिपॉझिटवर (FD) होती. ही एफडी अनुताईंनी म्हातारपणाच्या आजारपणासाठी आणि स्वत:च्या सुरक्षिततेसाठी ठेवली होती. रविवारी रात्री डायनिंग टेबलवर जेवताना सौरभने विषय काढला. "आई, मला ते तुझे पोस्टातले २५ लाख रुपये दे. माझा बिझनेस वाढतोय."

अनुताई शांतपणे म्हणाल्या, "बाळा, मी माझं सर्वस्व तुला दिलंय. आता तेवढेच २५ लाख माझ्या म्हातारपणाची काठी आहेत. उद्या मला दवाखाना लागला तर मी कुणापुढे हात पसरू? ते पैसे मी मोडणार नाही."

नकाराचा शब्द ऐकताच सौरभचा अहंकार दुखावला. ताटात जेवत असलेला सौरभ संतापाने उठला आणि दातओठ खात ओरडला,

"अरे कसला म्हातारपण आणि कसला दवाखाना? इथे आम्ही तुला पाळतोय ना? आई, तू या घरात "फुकट" राहतेस आणि "फुकट" जेवतेस! माझ्या पैशांवर जगतेस तू! माझा बिझनेस वाढतोय पण तुला तुझे पैसे द्यायला जीव जडतोय? फुकटचं खायला मात्र बरोबर चालतं! "सून मिताली बाजूला उभी राहून हसत होती. ज्या आईने स्वत:चे मंगळसूत्र विकून पोराचा बिझनेस उभा केला, तिलाच आज पोरगा अन्नावरून "फुकटी" म्हणत होता!

अनुताईंच्या काळजाचे हजार तुकडे झाले. डोळ्यांतून पाणी आलं, पण त्या एक शब्दही बोलल्या नाहीत. त्यांनी निमूटपणे स्वत:च्या ताटातला घास तिथेच सोडला, हात धुतले आणि त्या शांतपणे आपल्या खोलीत जाऊन झोपल्या.

**तो सत्याचा स्फोट आणि आईचा स्वाभिमानी प्रहार**:-सौरभला वाटले आई म्हातारी आहे, दोन दिवस रडेल आणि गप्प बसेल. पण दुसऱ्या दिवशी सकाळी सौरभ ऑफिसला जाण्यापूर्वीच अनुताई घरातून बाहेर पडल्या होत्या.

दुपारी २ वाजता सौरभ त्याच्या वर्धा रोडच्या केबिनमध्ये बसला होता, तेवढ्यात त्याचा मॅनेजर धावत आला.

"सर! बँकेने आपले सर्व अकाउंट्स "फ्रीज" (Fereeze) केले आहेत. आणि आपल्या कोल्ड स्टोरेजच्या गेटवर कोर्टाची नोटीस लागली आहे!"

सौरभच्या पायाखालची जमीनच सरकली. तो पळत गेटवर आला. तिथे एक नोटीस चिकटवली होती आणि समोर त्याचे वकील उभे होते.



कै. तुकाराम नारायण पावले व कै. श्रीमती चंद्रभागा तुकाराम पावले व कै. मुक्तेश्वर तुकाराम पावले यांच्या स्मरणार्थ
श्रीमती सुलभा मुक्तेश्वर पावले, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

सौरभने विचारले, "हे काय आहे ?"

वकील कडक आवाजात म्हणाले, "सौरभ, ज्या अर्धा एकर जागेवर तू हे ऑफिस आणि कोल्ड स्टोरेज उभा केलंयस ना... ती जागा तुझ्या आईच्या (अनुताईंच्या) नावावर आहे! मुलाचा बिझनेस म्हणून तिने तुला ती जागा गेल्या ३ वर्षांपासून "फुकट" वापरायला दिली होती.

आज सकाळी तुझ्या आईने स्वत: इथे येऊन बँकेचं "ना हरकत प्रमाणपत्र" (NOC) रद्द केलंय. आणि तुला १५ दिवसांत ही जागा रिकामी करण्याची कायदेशीर नोटीस (Eviction Notice) पाठवली आहे. तसंच, गेल्या ३ वर्षांचं या कमर्शियल जागेचं भाडं (Rent) जे "३६ लाख रुपये" होतं. ते तू न भरल्यामुळे तुझ्यावर केस ठोकली आहे!"

**अहंकाराचा चक्काचूर आणि गुडघे टेकलेला लेक- :** हे ऐकताच सौरभचा श्वास अक्षरश: कोंडला गेला! बँकेचे अकाउंट्स फ्रीज झाल्यामुळे त्याचे परदेशात जाणारे कंटेनर्स थांबले होते. आईने एका झटक्यात त्याचा करोडोंचा बिझनेस रस्त्यावर आणून ठेवला होता.

सौरभ वेड्यासारखा गाडी चालवत घरी आला. घरात अनुताई त्यांची बॅग भरत होत्या. सौरभ धावत गेला आणि त्याने थेट अनुताईंच्या पायांवर लोळण घेतली! तो ओक्साबोक्शी रडत म्हणाला, "आई... आई मला माफ कर! माझा बिझनेस बुडेल ग. मी रागाच्या भरात बोलून गेलो. ती नोटीस मागे घे आई... तुझे पाय धरतो मी!"

२अनुताईंनी अत्यंत निष्ठुरपणे आपले पाय मागे घेतले. त्यांच्या चेहऱ्यावर कालची ती लाचारी नव्हती, तर एका स्वाभिमानी स्त्रीचा तेज होता.

त्या म्हणाल्या, "सौरभ, तू काल मला म्हणालास ना की मी तुझ्या घरात "फुकट" जेवते ? बाळा, मी शिक्षिका आहे, फुकटचं खाणं माझ्या रक्तात नाही! तुझ्या या कोल्ड स्टोरेजच्या जागेचं ३ वर्षांचं भाडं ३६ लाख रुपये होतं. मी काल रात्री हिशोब केला. मी तुझ्या घरात जेवलेल्या अन्नाची आणि राहिलेल्या जागेची किंमत त्यातून वजा केली, तरीही तूच माझा कर्जदार निघतोस!

माझा हिशोब आज चुकता झालाय! ज्या आईने तुला जन्म दिला, तिला दोन घासांसाठी "फुकटी" ठरवणाऱ्या पोराच्या घरात मला एक सेकंदही राहायचं नाही. आता तो तुझा बिझनेस आणि ती तुझी बँक तू बघ... मी माझा मार्ग मोकळा केलाय!"

अनुताईंनी स्वत:ची बॅग उचलली आणि ताठ मानेने त्या घरातून कायमच्या बाहेर पडल्या. सौरभ आणि त्याची बायको मिताली रस्त्यावर उभं राहून रडत होते. करोडोंचा बिझनेस करणारा पोरगा आज एका म्हाताऱ्या आईच्या स्वाभिमानासमोर कायमचा "भिकारी" झाला होता!

आई-वडिलांना दोन घास खायला देताना त्यांना "फुकट्यासारखं राहतात" म्हणून टोमणे मारणाऱ्या आजच्या पिढीच्या काळजात भोक पाडणारी ही कथा.



**भुने हुए चना में अच्छी मात्रा में फाइबर और प्रोटीन पाया जाता है जो लंबे समय तक आपको पेट भरा हुआ महसूस कराने के साथ पाचन में सुधार कर सकता है।**

**भुने हुए चने, ब्लड शुगर के स्तर को कम करने में सहायक हो सकते हैं।**






**कै. प्रल्हाद पंढरीनाथ साळी (काळमेख) नशिराबाद यांच्या स्मरणार्थ**
**श्रीमती द्वारकाबाई प्रल्हाद साळी, बदलापूर यांच्या सौजन्याने कायमस्वरुपी पृष्ठदान. सन्माननिय हितचिंतक.**

# उपवर मुला - मुलींची नावे

## १) कु. कोमल (घटस्फोटीत)



ज. ता. ३१/१०/८८,
ज.वेळ: रात्री १०.४०,
ज. स्थळ: जळगांव

**रास :** कर्क, **नक्षत्र:** पुष्य, **गण:** देव, **चरण:** २रे,
**नाडी:** मध्य, उंची: ५'३'', रक्तगट: B+
**वर्ण:** गोरा, **शिक्षण:** B.Com, MSCIT,
Computer Course, Beauty Parlour
**व्यवसाय:-** ब्युटीपार्लर, **अपेक्षा:-**अनुरुप.,
**मुंबई पुणे स्थळांना प्राधान्य**
पत्ता : **श्री. बारसु रामदास सिताफळे,**
बी-३०३, ऋतुव्रत सोसायटी, आनंद नगर,
दिनदयाळ रोड, डोंबिवली (प),
जि. ठाणे - ४२१२०२, मोबा. ९३२६१८२४३५
-(९/२५)

## ४) कु. रचना



ज. ता. २५/१०/१९९७,
ज.वेळ: १३.५६,
ज. स्थळ: पुणे

**रास :** सिह, **नक्षत्र:** मघा, **उंची:** ५.२,
रक्तगट: B+ **वर्ण:** गव्हाळ, **अपेक्षा :** अनुरुन
**शिक्षण:** B.E. Computer
**नोकरी:-** आटोमेशन एज प्रायव्हेट लिमीटेड
बेलेवाडी, पुणे
**वार्षीक प्रा :** ८.५० लाख
**पत्ता : श्री. रामप्रसाद नारायण गणेश**
**सौ. वर्षा रामप्रसाद गणेश**
२११, अनंत पॅलेस, बालाजीनगर, धनकवडी,
पुणे ४११ ०४३
**मोबा.** ९८२२७४३७५८ / ९८२२७६१७५८
-(०८/२६)

## २) कु. शिवानी



ज. ता. ०५/१२/१९९४
ज. वेळ: दुपारी १.५५
ज. स्थळ: अहमदनगर

**रास :** धनु, **नक्षत्र:** पुर्वाषाढा, **गण:** मनुष्य,
**चरण:** ३रे, **नाडी:** , **उंची:** ५'४', **रक्तगट:** O+
**वर्ण:** गोरा, **शिक्षण:** BE-IT
**नोकरी कंम्पनी नाव :- Accentuer, Navi Mumbai**
**अपेक्षा :-** उच्चशिक्षित, इंजिनिअर, अनुरुप
**पत्ता : वडीलांचे नाव श्री. प्रविण खेमचंद साळी**
**आईचे नाव :** सौ. मोहिनी प्रवीण साळी
**मामाचे नाव :** श्री. प्रसाद मधुकर मुसळे
**घरचा पत्ता :** बी ५ साईश्याम प्लाझा, कात्रप,
बदलापूर (पूर्व) जिल्हा-ठाणे, पिन कोड ४२१५०३
संपर्क मो. ९८६०७३४४१९/८८७९७८५३४६
WhatsApp No. 9860734419/8879785346
-(६/२६)

## ५) कु. कोमल



ज. ता. ०५/०६/१९९८
ज. वेळ: रात्री ११.३६
ज. स्थळ: मुंबई

**रास :** तुळ, **नक्षत्र:** हस्त, **गण:** राक्षस,
**चरण:** ३रे,
**नाडी:** मध्य, **उंची:** '', **रक्तगट:**
**वर्ण:** गव्हाळ, **शिक्षण:** तिसरी
**अपेक्षा :-** अनुरुप.
**पत्ता : श्री. शेखर साळी**
युसुफ शेख चाळ, जुन्या पोलीस स्टेशनजवळ,
नाना पाटील प्राईडसमोर, वांद्रे पाडा, अंबरनाथ
(पश्चिम)
**संपर्क :** ९८९०३८२२६० / ९३२४६१८९६१
-(१२/२५)

## ३) डॉ. कु. ऋतुजा



ज. ता. ११/०८/१९९९
ज. वेळ: सकाळी १०.२३
ज. स्थळ: अहिल्यानगर

**रास :** कर्क, **नक्षत्र:** अश्लेशा, **गण:** राक्षस,
**नाडी:** अन्त्य, **उंची:** ५'५' **शिक्षण:** MBBS MD/MS
**अपेक्षा :-** MBBS, MD/MS स्वताचा दवाखाना
किंवा कायमस्वरुपी नोकरी मुंबई ,नवी मुंबई,
ठाणे, पुणे, अहमदनगर स्थळांना प्राधान्य
अनुरूप, सुसंस्कृत, निर्व्यसनी
**वडीलांचे नाव: श्री.** महेशकुमार हिरामण अहिरराव
**आईचे नाव :** सौ. वैशाली महेशकुमार अहिरराव
**पत्ता :** फ्लॅट नंबर १२०५,१२०६ रुतु रिव्हर व्ह्यू
क्लासिक बिल्डिंग क्र.४ के.एम. अग्रवाल कॉलेज
जवळ कल्याण पश्चिम पिनकोड ४२१३०१
**संपर्क :** ८८७९२२६९१३/८४४६६२८५०४
-(४/२०२८)

## १०) चि. नितिन



ज. ता. १३/०८/१९८२
ज. वेळ: सकाळी ८.३२
ज. स्थळ: भिवंडी

**रास :** **नक्षत्र:** **गण:**
**नाडी :** **चरण :** **उंची:** ५.५',
**वर्ण :** **रक्तगट:**
**शिक्षण :** BA & Computer
**नौकरी :** F M Logistic, Padgha, Bhivandi
**अपेक्षा:-** अनुरुप, विधवा किंवा घटस्फोटीत
**वार्षिक उत्पन्न :** २,४०,००० हजार
**वडीलांच नाव :** श्री. सुभाष विश्वनाथ गणेश
**सौ.** वासंती सुभाष गणेश
**संपर्क :** ७३७८५९८१५९ (०८/२६)

## ९) चि. ओंकार



ज. ता. २१/०८/१९९७
ज.वेळ: रात्री १०.४५,
ज. स्थळ: कल्याण

**रास :** मीन, **नक्षत्र : रेवती - २ नाडी:** अंत्य,
**गण :** देव **रक्तगट :** O+ **शिक्षण:** B. Com,
**नोकरी :-** Account Executive
(Writer Information)
**मा. उत्पन्न :** २५ हजार **अपेक्षा :-** अनुरुप,
**पाई/वडीलांचे नाव:** श्रीमती सुनिता सदाशिव गंगथडे
**पत्ता :-** रुम नंबर ५, सहयोग चाळ सोसायटी,
चिकनीपाडा, तिसगांव रोड, कल्याण (पूर्व)
४२१३०६
मो. नं. ८८७९८८६२५४/९८९२७७६९७१
-(५/२०२६)

## ११) चि. वेदांत



ज. ता. १९/०६/१९९७
ज.वेळ: रात्री ९.२०,
ज. स्थळ: शिराळा

**रास :** वृश्चिक, **नक्षत्र:** ज्येष्ठा, **नाडी :** आद्य
**रक्तगट:** B+ **उंची:** ६ फुट
**शिक्षण :** B. E. Computer
**व्यवसाय :** Royal Art Printers
A/24, Ground Floor, Sussex
Industrial Estate, DK Cross Road,
Near Rani Baug, Bycylla (East)
400027
**मा उत्पन्न:** ४-५ लाख **अपेक्षा:-** अनुरुप,
**आई/वडीलांचे नाव: नितीन गोपाळ पोरे**
**पत्ता** व **मोबाईल नंबर :**
९८१९१९१९८४३/९८२०१९१२३०
-(५/२०२६)


१७
कै. विठोबा गणपत कोळेकर (नाना कोळेकर) मुरुड-जंजिरा यांच्या स्मरणार्थ सौ. स्नेहलता जांभळे, सौ. अंजली वखारे, सौ. निलीमा काळे, सौ. सुजाता बत्तीन व सौ. नेहा डहाके यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

४३
कै. पांडुरंग महादेव काटकर यांच्या स्मरणार्थ श्री. किरण पांडुरंग काटकर, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान सन्माननिय हितचिंतक

# उपवर मुलांची नावे

## १) चि. अक्षय



ज. ता. १/६/१९९५,
ज.वेळ: दुपारी १.१०,
ज. स्थळ: अहमदनगर

**रास :** मिथुन, **नक्षत्रः** आद्रा (शांती केली आहे.)
**गणः** मनुष्य, **चरणः** चौथे, **नाडीः** आद्य,
**उंचीः** ५'७'', **रक्तगट :** B+ve **वर्णः** गहू,
**शिक्षणः** ९ वी पास **अपंगत्व :** 45%
**अपेक्षा :** अनुरुप, शिक्षित व मन मिळावू
**नोकरीः-** दुकानात कामाला आहे (बदलापूर-प.)
**प्राप्ती :** १८०००/- महिना
**आई : श्रीमती शारदा महेश टपळे**
**पत्ता : श्री.** सुरेश ज्ञा. टपळे
बी-७०५, संस्कार धाम, मांजर्ली रोड, हरी ओम स्वीट जवळ, कुळगाव, बदलापूर
संपर्क : अक्षय टपळे ८६००६८४६०४
सुरेश टपळे (काका) ९५०३०८७६३२
-(८/२०२६)

## २) चि. यश



ज. ता. २३/११/१९९७
ज. वेळः सकाळी ५.२९
ज. स्थळः इचलकरंजी

**रास :** सिंह, **नक्षत्रः** पूर्वा फा. (२) **गणः** मनुष्य,
**नाडी :** मध्य, **चरण :** २ रे **उंचीः** ५'९',
**वर्ण :** गोरा **रक्तगटः** O+ve
**शिक्षण :** BBA & Interior Designer Diploma (Puna)
**अपेक्षाः-** सुशिक्षीत व अनुरुप,
**व्यवसाय :** Balaji Interior
**मासिक उत्पन्न :** १ ते १.२० लाख
**पत्ता :** श्री. धनंजय (बाळा) चंद्रकांत आंबुर्ले
प्रतिक्षा, ४४४ ब, प्रभात रोड, मार्कंडी, चिपळुण, जि. रत्नागिरी
**संपर्क :** ९४२२०५३७६५ / ९७६७३५२५९२
(०८/२६)

## ३) डॉ. चि. फाल्गुन



ज. ता. ०७/०१/२०००
ज. वेळः सकाळी ६.३०
ज. स्थळः अहमदाबाद

**उंचीः** ५'८', **वजन :** ६५ kg, **नक्षत्रः** ज्येठ,
**शिक्षण :** BHMS
**व्यवसाय :** Doctor
**मासीक उत्पन्न :** १ ते १.२० लाख
**पत्ता : श्री प्रविणभाई एकनाथभाई अवाईक**
**सौ. मंगलाबेन प्रविणभाई अवाईक**
C/402, Shri. S.R.ICON, Nr. Lalgobi Circle, Hathijan, Ahmedabad - 482 445
Email - falgunavaik@gmail.com
-(०३/२६)

## ४) चि. शशांक



ज. ता. २०/०१/१९९१
ज.वेळः रात्री १०.२५,
ज. स्थळः मनमाड

**रास :** मिन, **नक्षत्रः** पुर्वाभाद्रपा
**वर्णः** गोरा, **उंचीः** ५.६', **रक्तगट :** O+
**शिक्षण :** B.Com, Software Testing
**नोकरीः-** JMFinancial Ltd. Borvali (Mumbai)
**उत्पन्न :** ९ लाख
**अपेक्षा :** अनुरुप
**आई/वडीलांचे नावः श्री. मनोहर सोनू निर्मळे**
**सौ. ललीता मनोहर निर्मळे**
**पत्ता व मो नं.:** R3, A-1305, Life Republic Manunji, Hinjewadi-Pune-411057
Mob. 9373806992/9225579464
-(३/२०२६)

## ५) चि. वैभव (घटस्फोटीत)



ज. ता. २३/६/१९८३,
ज.वेळः संध्याकाळी ५.४०,
ज. पुणे

**रास :** वृश्चिक, **नक्षत्रः** जेष्ठा, **वर्णः** गव्हाळ,
**उंची :** ५'७', **शिक्षणः** 10th.
**व्यवसाय :-** Cutting Masters
**वडीलांचे :-** कै. सुभाष चिल्लाळ
**आई :** विमल सुभाष चिल्लाळ (गृहिणी)
**बहीण :** सौ. वर्षा अनिल कलंके (बृहन मुंबई नगर परिषद शाळे मध्ये मुख्याध्यापक)
**पत्ता :** घोलप नगर, चाळ क्र. १, मिलिंद नगर, आनंद दिघे जिल्हा परिषद शाळेजवळ, खोली क्रमांक ४, कल्याण मुरबाड रोड, कल्याण (प.)
**संपर्कः**७९७७४९४४०४/८४५०९ १९५०१ **(आई)**
(०८/२६)

## ६) डॉ. चि. निखिल



ज. ता. २७/०९/१९९९
ज. वेळः दुपारी १०.१०
ज. स्थळ : सुरत

**रास :** वृश्चिक, **नक्षत्रः** ज्येठ, **गणः** राक्षस,
**नाडी :** आद्य **चरण :** चैथे **उंचीः** ५'९',
**वर्ण :** गोरा, **रक्तगटः** B+ve **अपेक्षाः-** अनुरुप,
**शिक्षण :** Bachelor of Physiotherpy
**व्यवसाय/नोकरी :** दवाखाना सुरत
**मासीक प्राप्तीः** ३५.०००/-
**अपेक्षा :** उच्च शिक्षित, अनुरुप
**आई/वडीलांचे नावः- शितल साळी**
**पत्ता व मोबाईल नंबर :** बी - १०४, तुलसी अपार्टमेंट, रंग अवधूत सोसायटी, माधव बाग जवळ, पर्वत पाटिया सुरत (पूर्व)
मो. ९८२४५५९३६१/९८२५५२८५०१
आजोबा मो. ९३२४६१८९६१
-(०४/२६)

## ७) चि. विभव



ज. ता. ०५/०४/२०००
ज. वेळः
ज. स्थळः

**शिक्षण :** B.Com., Light Operator Engineer
**व्यवसाय :** DJ Lights Sound Truss Business
**अपेक्षा :** उच्च शिक्षित, अनुरुप
**आई/वडीलांचे नावः- संजीव विद्याधर काटकर**
**संजीवनी संजीव काटकर**
**पत्ता व मोबाईल नं.:**203/A Regal Complex, Shantinagar, Ulhasnagar - 421 003.
Contact No.9834586502 Vibhav Katkar
-(०३/२६)

## ८) चि. विक्रांत



ज. ता. २६/०६/१९९५
ज.वेळः सकाळी ६.४९,
ज. स्थळः रत्नागिरी

**रास :** धनु, **रक्तगटः** B+ve
**उंची :** ५'१०', **नक्षत्रः** जेष्ठा, **नाडी :** आद्य,
**चरणः** १ले **गणः** राक्षस, **वर्णः** निमगोरा,
**शिक्षणः** आय. टी. आय. बी.एस.सी. (आय.टी)
**व्यवसाय :-** शेअर्स मार्केट ट्रेडिंग आणि क्लासेस
**मा. उत्पन्न. :** २५,०००/-
**आई/वडीलांचे नावः-**श्री. नंदकिशोर शंकर हरवंदे
सौ. सुवर्णा नंदकिशोर हरवंदे
**पत्ता :** मुक्काम पो. कुडली, पो. रेवसबंदर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी
**सध्याचा पत्ता :** घाटकोपर
संपर्क. ९४०३२७००९३ / ९६७३७७००९३
-(३/२६)

## विश्वस्त निधी

१६१) श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण १,०५१
१६३) श्रीमती रंजना श्रीकांत गोगे, मुंबई १,००१
१६५) सौ. गीता सुदर्शन भंडारे, कोल्हापूर १,१११
१६७) सौ. संजिवनी अशोक तांबे, नाशिक १,००१
१६९) श्री. सुभाष विष्णुपंत धारणकर, पुणे २,००१
१७१) सौ. निलम प्रभाकर गोंधळेकर, मुलुंड १,००१
१७३) श्री. सूर्यकांत बा. ढवण, मुंबई १,०५०
१७५) श्री. अनिल पा. चाफळकर (जंत्रे), मुंबई ५,०००
१७७) श्री. यशवंत विठ्ठल बीडकर, कल्याण १,०००
१७९) श्री. संजय संभाजी ढवण, चिपळूण १,००१
१८१) आशिष श्रीकांत एद्रे, बंगलोर १,००१
१८३) श्रीमती द्वारकाबाई प्रल्हाद साळी, उल्हासनगर २,७७५
१८५) श्रीमती समिता रविकांत ढोरजे, अंबरनाथ १,००१
१८७) श्री. सत्यजीत रघुनाथ घटे, ठाणे १,००१
१८९) ॲड. अरुण गणपतराव बडवे, इचलकरंजी १,००१
१९१) श्री. सदानंद रामचंद्र हुबळीकर, पुणे १,००१
१९३) सौ. अनुपमा गंगाधर भंडारे, नवी मुंबई १,००१
१९५) श्रीमती शालिनी बाळकृष्ण साळी, कल्याण १,५००
१९७) श्री. राजन म बाळदरे, बेळगाव (मस्कत) १,५०१
१९९) सौ. जनाबाई चंद्रसेन गणेश, सोलापूर १,५००
२०१) श्री. दिगंबर लालचंद भागवत, अंबरनाथ १,५०१
२०३) श्री. प्रकाश ज्ञानेश्वर किचंबरे, बदलापूर १,५०१
२०५) सौ. रुपाली अमित शेकटकर, खारघर २,००१
२०७) श्री. विलास बाबुराव सरोदे, औरंगाबाद १,५०१
२०९) सौ. रश्मी प्रविण जयदेवकर, नवी मुंबई १,५००
२११) श्री. जगन्नाथ धोंडीबा जुजार, कांदीवली १,५०१
२१३) श्री. किसन शंकर कथोरे, M.L.A १,६००
२१५) श्रीमती मायाबाई जगन्नाथ बागुल, नाशिक १,५००
२१७) श्री. ज्ञानेश्वर शंकर पाटणकर, कल्याण १,५०१
२१९) सौ. ललिता पंडित साळी, एरंडोल १,५०१
२२१) श्री. शरद खुशाल बोर्डे, विरार १,५००
२२३) श्रीमती वंदना परशुराम हावरे, गोरेगांव १,५०१
२२५) सौ. हेमलता विजयकुमार साळी, मुलुंड १,५०१
२२७) श्री. सुरेशचंद्र नारायण धारणकर, नाशिक १,५०१
२२९) श्री. अभिजीत जयंत साळी, मुलुंड १,५०१
२३१) श्री. रविंद्र गुलाबराव साळी (धरम), चाळीसगांव १,५०१
२३३) श्री. प्रविण दत्तात्रय उपरे, पुणे १,५०१
२३५) श्रीमती शोभा भास्कर खंडारे, डोंबिवली १,५०१
२३७) श्री. देविदास गंगाराम डहाके, जळगांव १,५००
२३९) श्री. एकनाथ रखमाजी पंडित, नाशिक १,५०१
२४१) श्री. शंकरराव दत्तात्रय गायकवाड, नाशिकरोड १,५०१
२४३) श्री. सतीश एकनाथराव मांजरे, कल्याण १,५०१
२४५) श्री. अरुण रामकृष्ण धमाले, बदलापूर १,५०१
२४७) सौ. मंगला संभाजी ढवण, चिपळूण १,५०१
२४९) श्री. हरिश मधुकर अष्टेकर, मुंबई १,५०१
२५१) श्री. गजानन भिकू सागावेकर, पेठमाप, चिपळूण १,५०१
२५५) सौ. सुनिता विलास सरोदे, औरंगाबाद १,५०१

१६२) सौ. प्रभावती प्रकाश दरंगे, नाशिक १,००१
१६४) श्रीमती कुसुम विष्णुपंत भोगरे, उल्हासनगर १,००१
१६६) श्री. मुकुंदराव ज्ञानोबा खुस्तले, पुणे १,००१
१६८) श्री. सुरेश बाबुराव रोडे, नाशिक १,००१
१७२) डॉ. विलास दशरथ आचारी, कोपरगाव १,०००
१७४) सौ. शांता निवृत्ती गायकवाड, सोलापूर १,१५०
१७६) सौ. मंगला हरिश अष्टेकर, मुंबई १,०००
१७८) सौ. उषा यशवंत बीडकर, कल्याण १,०००
१८०) श्री. प्रभाकर नारायण लांडगे, उल्हासनगर १,००१
१८२) श्री. हनुमंत विठ्ठल घुबे, पुणे १,००१
१८४) श्री. मिलींद चंद्रकांत जांभळे, अंबरनाथ १,००१
१८६) सौ. वसुंधरा गंगाधर काळे, मनमाड १,००१
१८८) श्री. अनंत गजानन जंत्रे, नाशिक १,००१
१९०) श्री. दिलीप वसंतराव मेन, अमरावती १,१११
१९२) श्री. गंगाधर शिवराम भंडारे, नवी मुंबई १,००१
१९४) श्री. निनाद मधुकर देसाई, पुणे १,०००
१९६) श्री. राजु बाबुराव जिंदे, भिवंडी १,१११
१९८) प्रा. डॉ. व. ज्ञा. साळी, पुणे २,००१
२००) सौ. रत्नमाला शशिकांत डहाके, ठाणे १,५१५
२०२) श्री. प्रमोद बळीराम किचंबरे, बदलापूर १,५००
२०४) श्री. प्रकाश नामदेवराव दैव, पुणे १,५०१
२०६) श्री. किसनराव भानुदास एडके, पुणे १,५००
२०८) श्री. बबन रामभाऊ भंडारे, नाशिक १,५०१
२१०) डॉ. भरत नानासो. तांबे, सासवड १,५००
२१२) श्री. रमेश गोपाळ शिंगारे, पुणे १,५०१
२१४) सौ. शिल्पा राजेंद्र वाडकर, कल्याण १,५०१
२१४) सौ. शिल्पा राजेंद्र वाडकर, कल्याण १,५०१
२१६) श्री. सतिश केशव सोनवणे, शहादा १,५०१
२१८) श्री. पंडित माधव साळी, एरंडोल १,५०१
२२०) श्री. राजकुमार दौलतराम देवकर, इंदौर २,६००
२२२) श्रीमती लता अर्जुन निवळ, नाशिक १,५०१
२२४) श्री. प्रकाश देवराम दाहोत्रे, पुणे १,५०१
२२६) श्री. दिलीप मारोतराव ढोरजे, पुणे १,५०१
२२८) सौ. शशिकला सुरेशचंद्र धारणकर, नाशिक १,५०१
२३०) सौ. दीपश्री धोंडू निमकर, ठाणे २,१००
२३२) सौ. शशिकला रविंद्र साळी (धरम), चाळीसगांव १,५०१
२३४) श्री. प्रकाश मल्हारी बुलबुले, चोपडा १,५०१
२३६) श्रीमती सविता सत्यवान पाटील, भांडूप १,५००
२३८) श्री. योगेश दत्तात्रय मते, पुणे १,५०१
२४०) श्री. दिलीप गजानन हरवंदे, चिपळूण १,५००
२४२) श्री. सुरेश विष्णू हेमाडे, वडगाव (बुद्रुक) १,५०१
२४४) श्री. प्रभाकर गुरुनाथ कापसे, कल्याण १,०११
२४६) श्री. धनंजय गणपत जठार, खडपोली चिपळूण १,०००
२४८) श्री. मल्लीकार्जुन टिप्पणा धोत्रे, गुलबर्गा (कर्नाटक) १,५११
२५०) श्री. दिपक सदाशिव जंत्रे, अंधेरी, मुंबई १,५०१
२५२) श्री. विजय तुकाराम कांदेकर, बदलापूर/पुणे २,०००
२५६) श्री. नितिन बालाजी ढवण, ठाणे १,५०१

१९
कै. तुकुबाई नागप्पा टोणपे (आई), कै. नागप्पा दामोदर टोणपे (वडील) व कै. दामोदर नागप्पा टोणपे (बंधू), सोलापूर यांच्या स्मरणार्थ श्री. मोहन नागप्पा टोणपे, वडाळा - मुंबई यांच्या सौजन्याने पृष्ठदान

४५
कै. शंकर गोपीनाथ हर्णेकर आणि कै. लक्ष्मीबाई शंकर हर्णेकर, यांच्या स्मरणार्थ श्री. कमलाकर शंकर हर्णेकर आणि सौ. महानंदा कमलाकर हर्णेकर, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान



स्मृतीपुष्प

# स्वकुळ समाचार आधारस्तंभ

आपल्या दिवंगत प्रिय व्यक्तीच्या नावे रू. १,५०१ आधारस्तंभास देणगी देऊन
स्वकुळ समाचारच्या समाज सेवेत सहभागी व्हा.

७६४) कै. विनायक विष्णू दांडेकर, मुलुंड
७६५) कै. बाबुराव आसाराम सरोदे, औरंगाबाद
७६६) कै. सौ. कमलबाई प्रभाकर शेकटकर, शेवगांव
७६७) कै. प्रभाकर बाबुराव आढाव, कल्याण
७६८) कै. सुनंदा एकनाथ पावले, चिपळूण
७६९) कै. विलास रामचंद्र आंबुर्ले, डोंबिवली
७७१) कै. रामचंद्र विष्णू मढेकर, बदलापूर
७७२) कै. भास्कर गुलाब खंडारे, डोंबिवली
७७३) कै. गणपत निळकंठ सरोदे, भिवंडी
७७४) कै. रुक्मिणी गणपत सरोदे, भिवंडी
७७५) कै. शंकरराव गुणाजी साळी, डोंबिवली
७७६) कै. विजय शंकर वगाद, ठाणे
७७७) कै. पुषलाल दसरुशेठ क्षीरसागर,
७७८) कै. पंडित कन्हैयालाल चित्तेवान, धुळे
७७९) कै. भास्करराव सुखलाल बागडे, डोंबिवली
७८०) कै. सौ. अनुजा अरुण बागडे, डोंबिवली
७८१) कै. राहुल नंदकिशोर धरम (साळी), इंदौर
७८२) कै. किसनराव रघुनाथ पोकळे, अहमदनगर
७८३) कै. त्र्यंबकराव रामचंद्र येखे, अहमदनगर
७८४) कै. सौ. जयश्री दत्तात्रय मते, पुणे
७८५) कै. सुमनबाई लक्ष्मण धरम (साळी), एरंडोल
७८६) कै. सौ. शकुंतला एकनाथ पंडित, नाशिक
७८७) कै. सौ. मनिषा मनोहर गोंधळेकर, चिपळूण
७८८) कै. सौ. शैला गोरखनाथ घोगे, बदलापूर
७८९) कै. सौ. शकुंतला माधवराव बंबाळे, चांदवड
७९०) कै. काशिनाथ रघुनाथ सातपुते, ठाणे
७९१) कै. श्रीमती शांताबाई माधवराव दिवटे, सुरत
७९२) कै. शंकरराव नारायण बांद्रे, पुणे
७९३) कै. मच्छिंद्रनाथ सिताराम साळी, पुणे
७९४) कै. सौ. पुष्पा सुरेश अष्टेकर, अहमदनगर
७९५) कै. सौ. वसुधा शशिकांत गोंधळेकर, डोंबिवली
७९६) स्वा. सै. कै. एकनाथराव गो. मांजरे, वैजापूर
७९७) कै. मनोहर बाबा गोंधळेकर, चिपळूण
७९८) कै. गोपाळराव झिपरु लांडगे, डोंबिवली
७९९) कै. श्रीमती मनोरमा गोपाळ लांडगे, डोंबिवली
८००) कै. श्रीमती शकुंतला पु. दिवाणे,
८०१) कै. बालाजी लक्ष्मण ढवण, भिवंडी
८०२) कै. श्रीमती विमलबाई खेमचंद साळी, शहादा
८०३) कै. श्रीमती सावित्रीबाई नरहर पुरे, नाशिकरोड
८०४) कै. किसन त्र्यंबक ढवण, विंचूर
८०५) कै. रुक्मिणीबाई किसनराव ढवण, विंचूर
८०६) कै. पुरुषोत्तम श्रावण वाहूळ, पुणे
८०७) कै. श्रीमती राधाबाई
८०८) कै. सौ. अंजना रामचंद्र घोले, ठाकुर्ली (डोंबिवली)
८०९) कै. काशिनाथ बळवंत डांगरे, इचलकरंजी
८१०) कै. कोंडाबाई काशिनाथ डांगरे,
८११) कै. गणपत बळवंत डांगरे, इचलकरंजी
८१२) कै. अनुसया गणपत डांगरे, इचलकरंजी
८१३) कै. गोपीनाथ दत्तात्रय ढवण, विंचूर
८१४) कै. लक्ष्मण सहदेव सहदेव सरोदे, नाशिक
८१५) कै. श्रीमती शकुंतला वा. कासटकर, उल्हासनगर
८१६) कै. वसंतराव मुरलीधर अष्टेकर, मुंबई
८१७) कै. तानीरामशेठ हिरामणशेठ बडकस, कुरंगीकर
८१८) कै. गं. भा. सोनाबाई ता. बडकस, कुरंगीकर
८१९) कै. हिरामणशेठ सखारामशेठ कापरे, एरंडोल
८२०) कै. आवडाबाई हिरामणशेठ कापरे, एरंडोल
८२१) कै. नारायणराव वंजीलाल बाळदे, सिन्नर
८२२) कै. गं. भा. राधाबाई ना. बाळदे, सिन्नर
८२३) कै. विठ्ठलशेठ हिरामणशेठ कापरे, एरंडोल
८२४) कै. सौ. वारुबाई विठ्ठलशेठ कापरे, एरंडोल
८२५) कै. सौ. मीरा बारसु सिताफळे, डोंबिवली
८२६) कै. हणमंतराव शंकरराव महादार, रत्नागिरी
८२७) कै. वसंतराव रघुनाथ साळी (सातपुते), कळवा
८२८) कै. मनोरमा रघुनाथ पाटणकर, डोंबिवली
८२९) कै. रमेश गणपत खेडकर, डोंबिवली
८३०) कै. अवंतिका ज. खडमकर, नाशिक
८३१) कै. सदाशिव अनंत जंत्रे, अंधेरी, मुंबई
८३२) कै. कु. छाया सदाशिव
८३३) कै. सोनू खंडू वाझट, सुरत
८३४) कै. मथुराबाई बाबुराव झडप, विंचूर, नाशिक
८३५) कै. मधुकर भिकू सागावेकर, पेठमाप, चिपळूण
८३६) कै. सुरेश माधवराव साळी, नेरुळ, नवीमुंबई
८३७) कै. श्रीकृष्ण नथू साळी (सर), पवई, मुंबई
८३८) कै. सौ. सुनिता प्रकाश भागवत, बदलापूर
८३९) कै. सुकलाल बाजीराव थोरात (साळी) अंबरनाथ
८४०) कै. सौ. गंगूबाई सुकलाल थोरात (साळी) अंबरनाथ
८४१) कै. प्रदीप मधुकर कांबळे, कळवा,
८४२) कै. सौ. विजया सुरेश कासटकर, मनमाड
८४३) कै. सोनाबाई व कै. त्रिंबकराव भाऊराव दळवी, पुंडी, आष्टी, बीड
८४४) कै. प्रभाकर (बापू) शंकर
८४५) कै. राजेश प्रताप सरोदे, कोपरी, ठाणे
८४६) कै. विद्या अनंत साळी, नवी मुंबई
८४७) कै. सृष्टी आनंद ओहोळ, लासलगाव
८४८) कै. सतिश सुर्यकांत
८४९) कै. सौ. सुशिलाबाई कन्हैयालाल काळे, ठाणे
८५०) कै. गं.भा. कल्पना मेघश्याम धमके, मुंब्रा
८५१) कै. अरविंद रघुनाथ पिठे, डोंबिवली
८५२) कै. भालचंद्र दशरथ चिल्लाळ, अंबरनाथ
८५३) कै. संपत तुकाराम खेडकर,
८५४) कै. रमेश संपत खेडकर, नाशिराबाद
८५५) कै. मधुकर बगोबा लहाने,
८५६) कै. इंदूमती बंसीधर जेघे, नाशिक
८५७) कै. सौ. सुमन बाळकृष्ण आढाव, ठाणे (प.)
८५८) कै. श्री. सुरेश महादेव तरटे (डोंबिवली-पूर्व)
८५९) कै. सौ. सुशिला सुरेश तरटे
८५८) कै. द्रौपदी भालचंद्र वाऊळ, रानवली

२०
**कै. सौ. शर्मिला हिच्या स्मरणार्थ श्री. व सौ. शामला सुरेश हरवंदे (महाड) यांच्या सौजन्याने पृष्ठदान**

४६
कै. प्रल्हाद एकनाथ काजवे, कै. मालनबाई प्रल्हाद काजवे, कै. मथुराबाई प्रल्हाद काजवे यांच्या स्मरणार्थ डॉ. पुरुषोत्तम प्रल्हाद काजवे, रत्नागिरी यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## वात पित्त आणि कफ याबाबत लेखांक

मानवी शरीरात वात पित्त आणि कफ याचे प्रमाण किती असावे

आयुर्वेदानुसार माणसाच्या शरीरात वात, पित्त आणि कफ या त्रिदोषांचे प्रमाण प्रत्येकाच्या जन्मजात प्रकृतीनुसार (Perakeriti) वेगवेगळे असते, परंतु निरोगी राहण्यासाठी ते संतुलित (Balanced) असणे आवश्यक आहे.

जन्मजात प्रमाण (प्रकृती): जन्माच्या वेळी शरीरात या तिन्ही दोषांचे जे प्रमाण असते, त्याला "प्रकृती" म्हणतात. ती आयुष्यभर स्थिर राहते. काही लोकांमध्ये एक दोष, तर काहींमध्ये दोन दोष (उदा.वात-पित्त) अधिक असू शकतात.

**आदर्श संतुलन:** जरी प्रत्येकाची प्रकृती भिन्न असली, तरी वात, पित्त आणि कफ यांचे प्रमाण संतुलित राहणे म्हणजे "स्वास्थ्य" (आरोग्य) होय.

**फुटपट्टी (अनुमानित):** जरी तिन्ही दोष शरीरात असतात, तरी शरीरातील हालचालींसाठी वात, चयापचय (Digestion) साठी पित्त, आणि शरीररचना व वंगण (Luberication) साठी कफ जबाबदार असतात. ते योग्य प्रमाणात असणे म्हणजेच त्यांचे आपल्या नैसर्गिक रूपात असणे होय.

**असंतुलन (विकृती):** चुकीचा आहार, जीवनशैली, ऋतू किंवा ताणतणावामुळे वात, पित्त किंवा कफ वाढतात, ज्यामुळे आजार निर्माण होतात.

**वात-पित्त-कफ शरीरातील भूमिका:**

**वात (वायू+आकाश):-** हे हालचाल आणि संप्रेषण नियंत्रित करते. **पित्त (अग्नी+जल):** हे पचन आणि चयापचय नियंत्रित करते. **कफ (पृथ्वी + जल):** हे शरीराला स्थिरता आणि वंगण (Lubercation) देते.

निरोगी राहण्यासाठी आपल्या शरीराची प्रकृती ओळखून त्याप्रमाणे आहार आणि जीवनशैली ठेवणे आवश्यक असते.

## शरीरासाठी उपयोगी डिटॉक्सवॉटर

नैसर्गिक पद्धतीने शरीर स्वच्छ आणि ताजेतवाने ठेवण्यासाठी घरच्या घरी बनवा हेल्दी Detox Wateer!

**साहित्य: पाणी** – १ लिटर **लिंबू** – १/२ मध्यम आकाराचे (स्लाइस करून) **आले** – 1 इंच (छोटे तुकडे करून) **काकडी** – १/२ (बारीक स्लाइस करून) **पुदिन्याची पाने** – एक मूठभर

**कृती**:- एका स्वच्छ भांड्यात १ लिटर पिण्याचे पाणी घ्या. त्यात स्वच्छ धुतलेली पुदिन्याची पाने, लिंबाचे काप, आल्याचे तुकडे आणि काकडीचे स्लाइस घाला.

हे पाणी रात्रभर झाकून ठेवा, जेणेकरून सर्व घटकांचे गुणधर्म पाण्यात उतरतील.

दुसऱ्या दिवशी सकाळी साध्या पाण्याऐवजी हे Detox Wateer प्या आणि ताजेतवानेपणाचा अनुभव घ्या!

**डिटॉक्स वॉटरचे फायदे:-** शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकून शरीर आतून स्वच्छ करते, Metabolism वाढवून fat burn करण्यास मदत करते, त्यामुळे वजन कमी होण्यास सहाय्य होते

बद्धकोष्ठता, गॅस आणि पचनाच्या समस्या कमी करून digestion सुधारते, त्वचा हायड्रेटेड ठेवते, मुरुमे व डाग कमी करण्यास मदत करते आणि त्वचा तजेलदार बनवत, लिंबू व आल्यामुळे Vitamin C मिळते व रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शरीरातील पाण्याची पातळी संतुलित ठेवून थकवा कमी करते

**दररोजची छोटी सवय, मोठा आरोग्यदायी बदल!**



## मानवी शरीरासाठी गोंद कतीराचे महत्त्व

गोंद कतीरा (Gond Katiera) हा एक नैसर्गिक डिंक असून, तो उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी, पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी अत्यंत उपयोगी आहे. पाण्यात भिजवल्यावर जेलीसारखा होणारा हा पदार्थ प्रामुख्याने सरबत, फालुदा किंवा दुधात मिसळून खाल्ला जातो, ज्यामुळे डीहायड्रेशन, बद्धकोष्ठता आणि थकवा दूर होतो

गोंद कतीराचे आरोग्यदायी उपयोग (Benefits of Gond Katiera): शरीराला थंडावा (Body Cooling): उन्हाळ्यातील उष्णता, लू आणि नाकातून रक्त येणे यावर गोंद कतीरा हा उत्तम उपाय आहे. तो शरीराचे तापमान नियंत्रित करतो

पचनक्रिया सुधारते (Imperoves Digestion): यात भरपूर फायबर असल्याने बद्धकोष्ठता (Constipation) दूर होते आणि पोटाचे विकार कमी होतात

उष्णतेपासून मुक्ती (Beat the Heat): गोंद कतीराचे सरबत किंवा फालुदा प्यायल्याने उष्माघातापासून (Heatsteroke) संरक्षण मिळते

रोगप्रतिकारक शक्ता (Boost Immunity): यात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असल्याने ते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

त्वचा आणि केसांसाठी (Skin & Haier): हे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकते, ज्यामुळे त्वचा निरोगी राहण्यास आणि केस मुलायम होण्यास मदत होते

अशक्तपणा दूर (Reduces Weakness): यामुळे शरीराला ताकद मिळते, थकवा दूर होतो आणि शारीरिक कमजोरीवर उपयुक्त ठरू शकते

कसा वापरावा? (How to Use): तास पाण्यात भिजवून ठेवा. तो फुगून जेलीसारखा झाल्यावर सरबत, लिंबू पाणी, दूध किंवा दह्यामध्ये मिसळून खावा

**संकलीत**

---

**चिंतन**

**– डॉ. दत्ता कोहिनकर (माईंडपॉवर ट्रेनर)**

**निवृत्तीनंतर**

एक खारुताई रोज आपले काम इमाने इतबारे करत असे. ती जास्तीपेक्षा जास्त काम करून पण खुश राहिली. कारण, ती ज्यासाठी काम करत होती, त्या जंगलाचा राजा सिंहाने तिला १० पोती अक्रोड द्यायचा शब्द दिला होता. खारुताई काम करता करता थकली की, तिला थोडा आराम करावा असे वाटे; पण तिला लगेच राजाचा शब्द आठवायचा आणि परत कामाला लागायची.

असाच एक दिवस उजाडला आणि सिंहाने खारुताईला १० पोती अक्रोड दिले आणि तिला स्वातंत्र्य बहाल केले. अक्रोडांच्या पोत्यांवर बसून खारुताई विचार करू लागली की, आता या अक्रोडांचं मी काय करू? अख्ख आयुष्य काबाडकष्ट करून मी दातांचा भुगा करून घेतला. आता अक्रोड चावायला दात कुठे आहेत?

ही गोष्ट आज आपल्यापैकी अनेकांची जीवन कहाणी बनली आहे. रिटायरमेंट नंतर निवांत राहायचं, फुल्ल मजा करायची म्हणून काहीजण रात्रंदिवस नुसते पैशामागे पळत सुटतात. आरोग्याकडे दुर्लक्ष होते. आजारांनी शरीर पोखरले जाते.

मग, रिटायरमेंटनंतर मजा करायला शरीर साथ देत नाही. ज्यांच्यासाठी काबाडकष्ट केले, ती घरातली मंडळी दुर्लक्ष करू लागतात. त्या वेळेला लक्षात येते, मी उद्या मजा करेन, असे म्हणणाऱ्या लोकांच्या आयुष्यात उद्या कधी येतच नाही.

म्हणून उद्या मजा करू म्हणून आज शरीराकडे व मनाकडे दुर्लक्ष करू नका. मृत्यू कधीही येऊ शकतो. म्हणून प्रगतीपथावर चालताना जीवनाचा आनंद घ्यायला शिका.



**कै. भगवान नागोजी माटोले व कै. श्रीमती कुसुम भगवान माटोले (देऊळगावराजा) यांच्या स्मरणार्थ सर्वश्री वसंत, प्रकाश व किशोर माटोळे बंधू यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

# फसवणुकीची नविन पद्धत!

फक्त ३० मिनिटांत तुमचे आर्थिक जीवन उद्ध्वस्त शकते.ही साधी फोन फसवणूक नाही ती त्याहून अधिक धोकादायक आहे. त्यांना तुमचे पैसे, पासवर्ड किंवा विश्वास नको आहे.त्यांना फक्त तुमची मदत करण्याची भावना हवी असते.

अलीकडेच मॉल, मेट्रो स्टेशन, बाजारपेठ आणि सार्वजनिक ठिकाणी एक नविन "मदत मागण्याची फसवणूक" दिसून येत आहे. फसवणूक करणारे बहुधा सुटसुटीत कपडे घातलेले मध्यमवयीन किंवा वयोवृद्ध लोक असतात. ते सांगतात की मला फोन वापरता येत नाही, पेन्शन किंवा सबसिडी तपासायची आहे, किंवा चुकीचे पान उघडले गेले आहे, आणि तुम्हाला त्यांचा फोन चालवण्यास मदत करण्याची विनंती करतात.

**धोक्याची बाब अशी आहे** :- जेव्हा तुम्ही त्यांचा फोन हातात घेता, तेव्हा तो अनेकदा आधीपासून व्हिडिओ कॉलवर असतो, किंवा स्क्रीन रेकाडिंग व चेहर्याची ओळख (फेशियल रिकग्निशन) सुरू असते.

फोनच्या दुसऱ्या बाजूला कोणी तरी तुमच्याकडे पाहत असते. तुम्हाला वाटते की तुम्ही मदत करत आहात, पण प्रत्यक्षात तुमची जैविक (बायोमेट्रिक) माहिती गोळा केली जात असते.

ही साधी फसवणूक नाही. ही एआय आधारित बायोमेट्रिक ओळख चोरी आहे. त्यांना तुम्ही नकोत त्यांना तुम्हीच हवेत. जर तुम्ही फोनला स्पर्श केला (बोटांचे ठसे), आकडे किंवा ओटीपी मोठ्याने वाचले (आवाज), किंवा फोन वापरताना कॅमेऱ्याकडे पाहिले (चेहऱ्याची हालचाल), तर तुमची तीन प्रमुख बायोमेट्रिक ओळख - बोटांचे ठसे, आवाज आणि चेहरा- चोरी होऊ शकतो.

आधुनिक एआय तुमचा जवळपासे हुबेहूब डिजिटल प्रतिरूप तयार करू शकते. यानंतर काय होऊ शकते, ते भयावह आहे. फसवणूक करणारे तुमच्या डिजिटल प्रतिरूपाचा वापर करून ऑनलाइन कर्ज, ग्राहक वित्त योजना, क्रेडिट कॅश आऊट इत्यादी घेऊ शकतात आणि चेहरा व आवाज पडताळणी सहज पार करू शकतात.

फक्त ३० मिनिटांत तुमच्या नावावर पात्र असलेली सर्व कर्ज मर्यादा वापरली जाऊ शकते. बँकेचे संदेश आल्यानंतर तुम्हाला कळते की तुमचे पैसे गेलेले नसतात, पण तुम्ही लाखो किंवा कोट्यवधी रुपयांच्या कर्जाच्या ओझ्याखाली सापडलेले असता.

**हे तीन नियम लक्षात ठेवा** : १) अनोळखी व्यक्तीचा फोन वापरायला मदत करू नका. फोनला स्पर्श करू नका, क्लिक करू नका, स्क्रीनकडे पाहू नका किंवा काहीही मोठ्याने वाचू नका जरी ते म्हणाले, "फक्त एक क्लिक करा." २) अनोळखी व्हिडिओ कॉल लगेच बंद करा. कॅमेऱ्याकडे पाहून बोलण्याची विनंती कधीही मान्य करू नका. ३) हा संदेश ज्येष्ठ नागरिक, मुले आणि मदतीसाठी तत्पर असलेल्या मित्रांना जरूर पाठवा. फसवणूक करणारे आता चांगल्या लोकांना लक्ष्य करत आहेत.

**शेवटची आठवण** : "माझ्याबरोबर असे होणार नाही" किंवा "मी इतका हुशार आहे की मी फसू शकत नाही," असे कधीही समजू नका. तुमचा आत्मविश्वास आणि चांगुलपणा हाच फसवणूक करणाऱ्यांचा फायदा असतो.

**राजू जठार**






कै. जगन्नाथ रामचंद्र घटे व कै. श्रीमती लक्ष्मीबाई जगन्नाथ घटे, जांभारी यांच्या स्मरणार्थ
श्री. रामचंद्र जगन्नाथ घटे व सौ. अल्का रामचंद्र घटे, डोंबिवली यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# श्री जिव्हेश्वर सामाजिक संस्था, कुळगांव बदलापूर आयोजित वासंतिक मेळावा २०२६

बदलापूर - रविवार दिनांक २६ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात आपले आराध्य दैवत भगवान श्री.जिव्हेश्वरांच्या पूजनाने व आरतीने करण्यात आली. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली.

कु. त्रिशा कोदे, परिणीती घुंद्रे, मनस्वी खुस्तले , त्रिशा साखरे व यज्ञा हरवंदे या निरागस चिमुकल्यांनी उत्साहाने सादर केलेल्या विविध नृत्यांनी रसिकांच्या मनात गोड लहर निर्माण केली. कु. तन्वी पाटील हिने सादर केलेल्या लल्लाटी भंडार या अप्रतिम नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली.

सौ. गीतांजली सुभेदार यांनी सुंदर राजस्थानी घुमर नृत्य सादर करत वातावरण भारून टाकले नरेंद्र धोत्रे, श्री. प्रविण साळी, सौ. विनिता घोंगे व श्री. हितेश पाटील यांनी चांद मेरा दिल हे समुह गान सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. कथाकथन व काव्यवाचन या सत्रात सौ. मनिषा देवकर, सौ. प्रतिभा पिंपरकर व सौ. उन्नती वखारे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत कथांचे व कवितेचे सादरीकरण केले. सौ. वैशाली कढेकर व त्यांच्या समूहातील महिलांनी एक दक्षिण भारतीय नृत्य आकर्षक व पारंपरिक पोषाखात सादर करून कार्यक्रमात रंगत आणि वैविध्याची सुंदर भर घातली.सौ. वैदेही वखारे व सौ श्रद्धा साळी यांच्या अनुक्रमे; छोटी शी कहानी से व सुन साहिबा सुन या सुरेल गाण्यांनी मोहक छटा निर्माण केली. श्री. श्याम अंबळकर, श्री. हितेश पाटील व श्री. सुभाष पाटील यांच्या गायनाने प्रेक्षकांच्या मनात अलगद रुंजी घातली. “मराठी संस्कृती संवर्धन” या नाटिकेतून, सौ. उर्मिला पिंगटे व त्यांच्या समुहाने आपल्या परंपरांचे प्रदर्शन करीत महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन करण्याचा उत्कृष्ट संदेश दिला. हे नाट्य विशेष प्रभावी ठरले. श्री प्रविण साळी, श्रीमती प्रतिभा धमाले, श्री. नरेंद्र धोत्रे, सौ. मनिषा अंबळकर, सौ.सोनिया सरोदे, सौ. विनिता घोंगे व श्री. राजेश साळी यांचे सुमधूर गायन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करुन गेले. सौ.वैदेही वखारे व त्यांच्या सह-भगिनींनी भारतीय संस्कृतीच्या विविधतेतील एकतेचे सुंदर प्रस्तुतीकरण; मिले सुर मेरा तुम्हारा या नृत्य-गायनाने सादर केले. हे सादरीकरण विशेष लक्षवेधी ठरले.

सौ. विणा साळी यांनी सादर केलेले पैंजणाचा नाद हे नृत्य सुंदर व मोहक ठरले. कार्यक्रमाच्या मध्यंतरात अंबरनाथ शहर स्वकुळ साळी समाज अध्यक्ष श्री. मिलिंद जांभळे, सचिव श्री.भरत थोरात, कोषाध्यक्ष श्री.सचिन हरवंदे, कल्याण शहर स्वकुळ साळी समाज महिला अध्यक्षा सौ. चंद्रलेखा सरवदे, कोषाध्यक्षा सौ.वैशाली भांदिर्गे, डोंबिवली शहर स्वकुळ साळी समाज अध्यक्ष श्री.पंकज साळी या विशेष निमंत्रित पदाधिकाऱ्यांचा सन्मान बदलापूर स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष श्री संजीव साळी, महिला अध्यक्षा - सौ. वैशाली कढेकर सचिव सौ.विद्याताई खुस्तुले यांच्या हस्ते करण्यात आला.

ठाणे जिल्हा अध्यक्षा सौ. शैलजा कासटकर, उपाध्यक्षा सौ.संगीता साळी, कोषाध्यक्ष श्री. किसनराव जेधे, स्वकुळ समाचार मासिकाचे संपादक श्री.ईश्वर फंड या पदाधिकाऱ्यांना अध्यक्ष श्री.संजीव साळी , सचिव सौ. मनिषा दुर्गुळे, खजिनदार श्री.अभिजित कोदे यांच्या हस्ते रुमाल पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. सदर प्रसंगी ठाणे जिल्हा पदाधिकाऱ्यांनी आपले यथोचित मनोगत व्यक्त केले.

ह्या कार्यक्रमाचे सूत्र सौ. मनिषा देवकर यांनी सांभाळले. कार्यक्रमाच्या शेवटास श्री. निलेश जंत्रे यांनी सूत्रसंचालन केलेल्या “युवारंग” या समुह सादरीकरणाने तरुणाईचा उत्साह रंगमंचावर खुलला. उपस्थित युवकांनी आपली ओळख करून देत स्वत: चे शिक्षण, छंद व ध्येय मांडले. हा उपक्रम अतिशय प्रेरणादायी ठरला.

ह्या संपूर्ण कार्यक्रमातील विविध सादरीकरणाचे ध्वनीसंकलन करून आपल्या लॅपटॉप द्वारे ध्वनीव्यवस्थापनाचे महत्वाचे चोख काम कार्यकारणी सदस्य श्री राजेश साळी यांनी केले. सौ.प्रतिभा पिंपरकर व सौ. शारदा कोकाटे यांच्या नेटक्या व रंगतदार सुत्रसंचालनामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत अधिकच वाढली.

सभेच्या सचिव सौ.मनिषा दुर्गुळे यांनी संबंधितांचे आभार मानले. सुग्रास भोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

**वृत्तांत लेखन - सौ.सुनीता किंचबरे व श्री राजेश साळी**



**कै. सुर्यकांत (भाई) गोपीनाथ भागवत, मुलुंड यांच्या स्मरणार्थ**
**श्रीमती सुप्रिया सुर्यकांत भागवत, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

# योग आणि महिलांचे आरोग्य

महिलांच्या आयुष्यात तीन टप्पे महत्त्वाचे असतात.

**पहिला टप्पा म्हणजे ती वयात येते व ज्या वेळी तिला पाळी येते तो. दुसरा टप्पा ती जेव्हा गरोदर असते तो आणि तिसरा म्हणजे रजोनिवृतीचा**

हे तिन्ही टप्पे पार करतना जर प्रत्येक स्त्रीने योगासने केली तर तिचे आयुष्य वेदनारहित जाईल.

**योग म्हणजे काय ?**

योग म्हणजे चित्ताच्या वृत्तीचा निरोध होय.

महर्षी पतंजली यांनी "योगश्चित्तवृत्तिनिरोध:" अशा प्रकारे योगाची व्याख्या केलेली आहे. अर्थात योग आमच्या मनाच्या वृत्तीचा निरोध आहे. जेव्हा मानवाच्या मनाची वृत्ती पूर्णत: निरुद्ध होते, तेव्हा मानवाला समानता प्राप्त होते आणि तो निष्कामभावाने कर्म करण्यास प्रारंभ करतो

महर्षी पतंजली यांनी यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी असे योगाची आठ अंगे सांगितलेली आहेत.

योगात यम, सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह यांचे पालन आहे.

नियम शौच, संतोष तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान यांचे ते अनुष्ठान आहे.

योगासन म्हणजे विशिष्ट स्थितीत शरीर स्थिर करणे होय. प्राणायाम हे मनाच्या शांतीचे साधन आहे. प्रत्याहार हा मनाला भोगांपासून परावृत्त करतो. धारणा हे एकाग्रतेचे नाव आहे. एकाग्रताने स्थिर होणे हेच ध्यान आहे. व्यक्तीचे परम चेतनेमध्ये सामावणे म्हणजेच समाधी.

**महिलांचे स्वत:कडे दुर्लक्ष:-** महिला सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत मुलांच्या पतीच्या आणि इतर कौटुंबिक सदस्यांच्या सेवेत स्वत:ला गुंतवून घेतात.त्यामुळे स्वत:च्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष होत जाते आणि मग वाढत्या वयानुसार आरोग्याच्या समस्या भेडसावतात. अंगावर दुखणे काढल्याने समस्या अजून जटिल होत जातात आणि मग कुटुंबाच्या देखभालीत कमी पडल्याने मानसिक ताणतणाव वाढत जातो आणि स्वभाव चिडचिडा होतो. मग मानसिकदृष्टया महिलेमध्ये एकटेपणाची भावना वाढून लागते डिप्रेशन येते. मग या सर्वांमधून बाहेर पडण्यासाठी महिलांनी थोडे स्वार्थी होणे गरजेचे असते. त्यांनी स्वत:ला पण वेळ द्यावा. पुरेसा व्यायाम करावा, चालणे, योग करणे इत्यादी व्यायाम प्रकार करावेत किंवा स्वत:च्या जीवन शैलीचा तो एक भाग बनवून घ्यावा. रोज अर्धा एक तास योग केल्याने तर महिलांच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात वाढते वजन नियंत्रणात येते. विकार बरे होतात. वाढते शुगर, गर्भाशयाच्या तक्रारी इत्यादी वर योग वरदान म्हणून सिद्ध झाला आहे. अनेक आजार तर हार्मोन्स इन बॅलन्सने सुरू होतात. योग केल्यामुळे सर्व समस्या कमी होऊ शकतात आसनेन, प्राणायाम, सूर्यनमस्कार, केल्याने महिलांच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. म्हणूनच समस्या निर्माण होण्याआधी सावध होणे गरजेचे असते. म्हणून प्रत्येक स्त्रीने योगाला महत्त्व देऊन आपले आरोग्यपूर्ण जीवन जगावे.

**महिलांचे मानसिक विकार :-** महिलांना जीवन जगत असताना मनाची अवस्था चांगली असणे खूप गरजेचे आहे .

मासिक पाळीची सुरुवात, गर्भारपण, प्रसूती आणि मासिक पाळी बंद होणे या टप्प्यावर काहीतरी विशिष्ट मानसिक आजार होतात.त्यांना स्त्रियांमधील मानसिक आजार असे म्हणले जाते.

या टप्प्यावर स्त्रियांना मोठे शारीरिक मानसिक व सामाजिक बदल करावे लागतात.त्यामुळे त्यांची मानसिक स्थिती बिघडू शकते.

शरीरातील प्रत्येक कार्य मेंदूशी निगडित असल्याने या हार्मोन्सचा मेंदूवर परिणाम होतो. हार्मोन्सचे संतुलन बिघडल्यामुळे स्त्रियांना हे आजार होतात असे समजले जाते.

पौगंडावस्थेमध्ये मुलींमध्ये उदासीनता, भित्रेपणा यासारखे आजार मुलांच्या तुलनेने जास्त दिसून येतात. बहुतेक स्त्रियांना मासिक पाळीच्या थोड्या आधी किंवा त्या



कै. भागीरथी रामचंद्र दळवी व कै. रामचंद्र मारुतीराव दळवी, पुणे यांच्या स्मरणार्थ
स्वकुळ रत्न श्री. जनार्दन रामचंद्र दळवी, पुणे यांच्य सौजन्याने पृष्ठदान.

दरम्यान लहरीपणा, कंटाळाव अन्य त्रास होतात. काही स्त्रियांना हे त्रास होतात. हे त्रास होताना स्त्रियांमध्ये टोकाचे बदल होतात.

गर्भारपणात महिला आनंदी समाधानी असणे अपेक्षित असते. पण काही स्त्रियांना समाधान वाटते, कधी कधी स्वत: भीती वाटू शकते. हे सर्व त्रास नंतर वाढतात किंवा नव्याने सुरुवात होते .

मासिक पाळी थांबण्याच्या वेळी बहुतेक स्त्रिया झोपेच्या तक्रारी अनुभवतात. वारंवार झोप नीट न झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांना अशक्तपणा, निरुत्साह, उदासीनता जाणवते. त्याला डोमिनो इफेक्ट्स म्हणतात. अशा झोपण्याच्या तक्रारीमुळे आणि इतर मेंदूतील बदलामुळे स्त्रियांना उदासीनतेचा आजार नव्याने होण्याची शक्यता असते. अलीकडच्या संशोधनात असे आढळून आले आहे की या वयात विस्मृतीचे लक्षण असू शकते या सर्व कारणांमुळे या वयात या स्त्रीने झोपेच्या त्रासाची दखल घेऊन वेळेत उपचार केले पाहिजे.

स्त्रियांच्या आरोग्यावर आणि स्थैर्यावर तिच्या कुटुंबाचे भविष्य अवलंबून असते. शारीरिक आरोग्यासाठी जसा उपचार सल्ला गरजेचा असतो; त्याचप्रमाणे मानसिक आरोग्याची काळजी महत्त्वाची असते

**योगाचे महत्त्व**:- योगाचे आपल्या आयुष्यात खूपच महत्त्व आहे. रोज योग केल्याने माणूस ताणतणावपासून दूर राहतो. इतकेच नाही तर माणसाचे वजन, हाडे, मांसपेशी आणि सांधेदेखील दणकट राहातात. योगामुळे शरीरामध्ये ऊर्जा निर्माण होते. शिवाय नियमित योग केले तर कोणत्याही आजारापासून माणूस दूर राहू शकतो. पण त्यासाठी ही गोष्ट नियमित करणे आवश्यक आहे. योगामुळे रक्तदाबदेखील नियंत्रणात राहातो. त्यामुळे योग हा बऱ्याचशा आजारांना दूर ठेवतो, जे जास्त महत्त्वाचे आहे.

ध्यानधारणा करणे हे शरीरासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. काही मिनिटे ध्यान लावून बसले की, माणसाच्या मनात आणि शरीरामध्ये शक्तीचा संचार होतो. सकाळीच ध्यान केल्यामुळे माणसाचे मन एका विशिष्ट दिशेने कार्यरत राहते. तसेच पूर्ण दिवस मन एकाग्र, शांत आणि संतुलित राहते; दिवसभराच्या तणावपासून दूर राहण्यास मदत होते.

प्रत्येक महिलेने स्वत:साठी थोडा तरी वेळ कडून योग करावा व आपले जीवन आनंदमय आणि सुखमय करावे.

## ब्रिटीश काळात डॉ. बी.आर. आंबेडकर यांना अटक का झाली नाही?

ही एक अशी गोष्ट आहे जी अनेकांना माहीत नाही. भारत सरकारने गांधी आणि नेहरू यांना अनेकवेळा अटक केली, पण अनेक आंदोलनांचे नेतृत्व करणाऱ्या आंबेडकर यांना कधीच अटक का केली नाही, त्यामागची कारणे जाणून घेऊया. बाबासाहेब आंबेडकरांचा ब्रिटनमधील ज्या विद्यापीठांमध्ये त्यांनी शिक्षण घेतले, तिथे एक विशेष संघटना (Association) होती.

जगातील नामांकित बुद्धीवंतांचाच या समुदायात समावेश केला जाई. आंबेडकरांकडे ही पात्रता असल्याने ते त्याचे सदस्य झाले. ज्यांना या संघटनेचे सदस्य व्हायचे असे, त्यांना जगातील सर्व देशांच्या संविधानाचे पूर्ण ज्ञान असणे हा एक नियम होता. सामान्य सुशिक्षित लोकांना याचे सदस्यत्व मिळत नसे. ज्या ब्रिटीश साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नसे, त्या साम्राज्यात या समुदायाच्या सदस्यांना विशेष मान, ओळख आणि पाठिंबा मिळत असे.

ते सदस्य कोणत्याही देशात असले तरी, ब्रिटीश सरकार त्यांना कोणताही अपमान सोसावा लागणार नाही याची काळजी घेत असे. डॉ. बी.आर. आंबेडकर भारतात राहत असताना, जर पोलिसांनी त्यांना अटक करायची असेल, तर त्या विद्यापीठाची किंवा संघटनेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते. भारतातील सडलेली सामाजिक व्यवस्था सुधारण्यासाठी आंबेडकरांनी अनेक आंदोलने

पुढिल मजकुर पान नं.२८



कै. तुकाराम लक्ष्मण घोंगे व कै. सुशिला तुकाराम घोंगे, बोरीवली तसेच
कै. सिताराम लक्ष्मण घोंगे व कै. सौ. इंदिरा सिताराम घोंगे (लोअरपरेल) यांच्या स्मरणार्थ पृष्ठदान.

## स्वाभिमानाचे जगणे

अमरावतीच्या शाम नगरमध्ये राहणाऱ्या ६२ वर्षांच्या "सुलोचनाबाई" एक निवृत्त शिक्षिका होत्या. पाच वर्षांपूर्वी पतीच्या निधनानंतर त्या आपल्या 2BHK च्या छोट्या पण सुंदर घरात एकट्याच राहायच्या. त्यांची एकुलती एक लाडकी लेक, "स्नेहा" पुण्यात एका मोठ्या कंपनीत इंजिनिअर असलेल्या मुलाशी लग्न करून सुखात राहत होती.

सुलोचनाबाईंची पेन्शन आणि हे स्वत:चे घर, हाच त्यांच्या म्हातारपणाचा एकमेव आधार आणि स्वाभिमान होता. दिवाळीच्या सुट्टीत स्नेहा, तिचा नवरा (अविनाश) आणि दोन मुले अमरावतीला आईकडे राहायला आले. सुलोचनाबाईंनी लेकीसाठी स्वत:च्या हाताने चकल्या, लाडू बनवले होते. घर नातवांच्या आवाजाने गजबजून गेले होते.

तो स्वार्थाचा प्रसंग आणि म्हातारपणाची किंमत :

सुट्टी संपायच्या आदल्या रात्री सर्वजण हॉलमध्य बसले होते. बोलता बोलता स्नेहा अचानक म्हणाली,

"आई, तू इथे अमरावतीत एकटीच राहतेस. तुझं वय झालंय. पुण्यात आमच्या घराचा हप्ता खूप वाढलाय आणि मुलांच्या शाळेचा खर्चही परवडत नाहीये. आमचं असं म्हणणं होतं की, तू हे अमरावतीचं घर माझ्या नावावर करून दे. आपण हे घर विकून टाकू. त्यातून जे ४०-४५ लाख येतील,ते मी मुलांच्या भविष्यासाठी फिक्स डिपॉझिट (FD) मध्ये ठेवेन. आणि तू इथे एकटी राहण्यापेक्षा आमच्यासोबत पुण्याला चल. आमच्या फ्लॅटमधल्या छोट्या रूममध्ये तू आरामात राहू शकतेस."

सुलोचनाबाईंच्या काळजाचा ठोका चुकला. ज्या लेकीसाठी त्यांनी आणि त्यांच्या नवऱ्याने आयुष्यभर काबाडकष्ट केले, ती लेक आज आईची विचारपूस करण्याऐवजी थेट आईच्या "छतावर" हक्क सांगत होती.

जावई अविनाशही मध्येच म्हणाला, "हो सासूबाई, तसंही हे घर जुनं झालंय. तुम्ही आमच्याकडे आलात की मुलांना सांभाळायला कुणीतरी हवंच आहे. आया (Maid) खूप पैसे घेतात आजकाल."

सुलोचनाबाईंना समजून चुकले होते. लेकीला आणि जावयाला म्हातारी "आई" नको होती, तर त्यांना आईची "प्रॉपर्टी" आणि पोरांना सांभाळण्यासाठी एक "फुकटची मोलकरीण" हवी होती!

पण सुलोचनाबाईंनी कोणताही वाद घातला नाही. त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं होतं, पण त्या फक्त शांतपणे आणि अत्यंत मूकपणे हसल्या. त्या एवढंच म्हणाल्या, "ठीक आहे बाळा, मी विचार करते." स्नेहा खुश झाली. तिला वाटलं आई तयार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी ते सर्वजण पुण्याला निघून गेले.

**तो स्वाभिमानी निर्णय आणि सत्याचा स्फोट :** सहा महिने उलटून गेले. स्नेहाने पुण्यातून वकिलाकडून "गिफ्ट डीड" (Gift Deed) चे पेपर्स तयार करून घेतले. ती गाडी करून आईच्या सह्या घेण्यासाठी आणि घराचा ताबा घेण्यासाठी अमरावतीला पोहोचली.

पण जेव्हा ती आपल्या आईच्या (सुलोचनाबाईंच्या) घरासमोर पोहोचली, तेव्हा तिच्या पायाखालची जमीनच सरकली!

घराच्या दरवाजावर आईच्या नावाच्या पाटीऐवजी "देशपांडे निवास" अशी नवीन पाटी लागली होती! स्नेहाने घाबरत बेल वाजवली. एका अनोळखी माणसाने दार उघडले.

स्नेहाने विचारले, "माझी आई कुठेय? आणि तुम्ही या घरात काय करताय?"

तो माणूस म्हणाला, "मॅडम, मी हे घर पाच महिन्यांपूर्वीच सुलोचना मॅडम कडून ४२ लाख रुपयांना रीतसर विकत घेतलंय. त्या तर हे शहर सोडून कधीच निघून गेल्या. पण त्यांनी तुमच्यासाठी हे एक पाकीट माझ्याकडे दिलं होतं."

कै. श्री. मनोहर रामचंद्र सरोदे व कै. श्रीमती उषा मनोहर सरोदे (डोंबिवली) यांच्या स्मरणार्थ
सौ. अनुप्रिया शंतनु कोळेकर (मुलगी) व श्री. सरोदे बंधू डोंबिवली यांच्य सौजन्याने पृष्ठदान.

स्नेहाचे हात थरथर कापू लागले. तिने ते पाकीट उघडले. त्यात एक पत्र होते, जे तिच्या आईने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले होते.

अहंकाराचा शेवट आणि डोळ्यांतून वाहणारा पश्चात्ताप :

**पत्रात लिहिले होते- :**

"माझ्या लाडक्या लेकीला, स्नेहाला... तू जेव्हा मला घर मागितलंस आणि मुलांना सांभाळायला पुण्याला बोलावून घेतलंस, तेव्हाच मला तुझ्या मनातली हाव समजली होती. बाळा, मी जन्मदात्री "आई" आहे, माझी नजर पोरांचा स्वार्थ एका सेकंदात ओळखते.

ज्या घरात मी माझ्या नवऱ्यासोबत संसाराची स्वप्ने रंगवली, ते घर तुम्ही फक्त ४५ लाखांच्या "नोटा" म्हणून बघत होतात. म्हातारपणी आई-वडिलांना दोन घास प्रेमाचे हवे असतात, पण तुम्हाला माझ्या रूपात एक "मोलकरीण" आणि एक "बँक बॅलन्स" हवा होता!

मी हे घर विकलं. पण तो पैसा मी माझ्यासोबत नेला नाही. त्या ४२ लाखांमधले २ लाख मी माझ्या स्वतःच्या आजारपणासाठी ठेवले आहेत. आणि उरलेले ४० लाख रुपये मी "इंदूर" (मध्य प्रदेश) मधील एका अनाथ आश्रमाला दान केले आहेत. मी आता त्याच आश्रमात, त्या अनाथ लेकरांची "आजी" बनून शांततेत माझं उरलेलं आयुष्य जगत आहे.

तू माझा शोध घेण्याचा प्रयत्न करू नकोस. कारण ज्या लेकीला जिवंत आईपेक्षा तिच्या विटांच्या घराची जास्त ओढ असते, तिच्यावर ओझं बनून राहण्यापेक्षा या म्हातारीने स्वतःचा स्वाभिमान जपलेला कधीही चांगला! तुला आणि तुझ्या मुलांना पुढील आयुष्यासाठी खूप आशीर्वाद! ते पत्र वाचताच स्नेहाच्या हातातून ते कागद खाली पडले! ती वेड्यासारखी तिथेच रस्त्यावर कोसळून ढसाढसा रडू लागली!

ज्या आईला ती "अडाणी" समजून तिच्या प्रॉपर्टीवर डोळा ठेवून बसली होती, त्या स्वाभिमानी आईने एका झटक्यात लेकीच्या स्वार्थाच्या थोबाडीत लगावली होती! स्नेहाकडे आज फ्लॅट होता, गाडी होती.. पण डोक्यावर मायेची पाखर देणारी आणि चुकीच्या वेळी कान पकडणारी ती खऱ्या अर्थाने "श्रीमंत" आई कायमची पारखी झाली होती!

म्हाताऱ्या आई-वडिलांच्या मालमत्तेवर डोळा ठेवून त्यांना ओझं समजणाऱ्या आजच्या पिढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी ही कथा.

**संकलित**

पान नं.२६ वरुन

केली. एकदा एका पोलीस अधिकाऱ्याने आंबेडकरांना अटक करण्याची धमकी दिली, तेव्हा बाबासाहेब थोडे हसले आणि शांत राहिले. दुसऱ्यांदा त्याच पोलीस अधिकाऱ्याने खरोखरच अटक करणार असल्याचे सांगितले. हे ऐकून आंबेडकरांनी विचारले, "अटक वॉरंट आहे का?"

ब्रिटीश पोलीस अधिकाऱ्याने अटक वॉरंट तयार करून परवानगीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवले. सरकारने ते पाहिल्यावर, आंबेडकरांना अटक न करण्याच्या नियमाची माहिती नसल्यामुळे त्या पोलीस अधिकाऱ्याला नोकरीवरून निलंबित केले.या विषयावर आंबेडकरांनी ब्रिटीश सरकारला विचारले, "तुम्ही फक्त मला अटक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित केले, पण त्याला मदत करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांचे काय?" परिणामी, ब्रिटीश सरकारने या प्रकरणात सामील असलेल्या इतर सर्व ब्रिटीश अधिकाऱ्यांनाही निलंबित केले.

असे होते बाबासाहेब डॉ. बी.आर. आंबेडकर! ब्रिटीश विद्यापीठाच्या त्या तत्कालीन संघटनेत संपूर्ण भारतातून फक्त एकच सदस्य होता आणि ते म्हणजे...

**"फक्त डॉ. बी.आर. आंबेडकर"**



**कै. सौ. प्रभावती अंबादास साळी (सासुबाई) व कै. सौ. सुशिलाबाई मधुकर साळी (आई) यांच्या स्मरणार्थ सौ. विनिता विवेकानंद साळी, कल्याण यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

# स्वकुळ साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी' चा २१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा!

यावर्षी २०२६ साली आलेला "ज्ञातिगृहा" चा २१ वा वर्धापनदिन अतीव उत्साहात आळंदी येथील समाजाच्या ज्ञातिगृहाच्या श्री सद्गुरु तात्या महाराज महापुरुष सभागृहात येथे साजरा झाला. गेला महिनाभर यासाठी "ज्ञातिगृहा" ची विश्वस्त कार्यकारिणी पूर्ण ताकदीनिशी तयारीत गुंतली होती. कार्यक्रम सुविहित आणि समयोचित व्हावा यासाठी प्रयत्नशील होते. **कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. स्वरुपजी कंकाळसाहेब, उपजिल्हा अधिकारी, महाराष्ट्र शासन आणि श्री. राजेश पांडुरंग उगले शेठ, उद्योजक, हिरा ज्वेलर्स** यांच्या आगमनानंतर त्यांचे स्वागत झाले. उभय जोडप्यांच्या हस्ते सकाळी नऊच्या सुमारास प्रथम ज्ञानेश्वर माउलींची अभिषेक पूजा करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या हस्ते ज्ञातिगृहातील श्री जिव्हेश्वर मंदिरातील भगवान श्री जिव्हेश्वर आणि माता अंकिनी - दशांकिनींना दुग्धाभिषेक करण्यात आला. याप्रसंगी ज्ञातिगृहातील उपस्थितांनीही अभिषेकाचा आनंद घेतला. तेथील सोपस्कार उरकल्यानंतर सामुदायिक आरती होऊन प्रसाद ग्रहण करून सर्वजण मुख्य सभागृहात आले. मंगलध्वनीच्या वातावरणात आदरणीय पाहुण्यांच्या हस्ते आणि उपस्थित सन्माननीयांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन झाल्यानंतर **संस्थेचे मावळते अध्यक्ष श्री. चंद्रकांत हावरे** दोन्ही पाहुण्यांना आणि आताचे अध्यक्ष श्री.अमित उगले यांना व्यासपीठावर घेऊन आले. संस्थेचे दुस-यांदा सचिवपद सांभाळणा-या श्री. देवेन क्षीरसागर यांनी निवेदकाची सूत्रे हातात घेतली. पाहुण्यांना शाल, गळ्यात उपरणे (दुपट्टा ज्यावर ज्ञातिगृहाचे नाव व भगवान श्री जिव्हेश्वर छापलेले आहे), श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि माउली ज्ञानेश्वरांची लोभस मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. देवेन यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिल्यानंतर दीड एकशे उपस्थितांना दोन्ही पाहुण्यांनी संबोधित केले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते मुख्य कार्यक्रम जो पूर्ण महाराष्ट्रातून आपल्या समाजातील जे तेरा नगरसेवक/सेविका निवडून आले त्यांचा सत्कार करण्यासाठी तेरा पैकी उपस्थित सौ. वैशाली मधुकर निमकर, मुरादपूर, चिपळूण, सौ. रूपाली आनंद गदगे सोलापूर आणि सौ. माधुरी सुरेश लोकरे किल्ले धारूर जि. बीड यांना पाचारण करण्यात आले. त्यांना पाहुण्यांच्या हस्ते शाल, दुपट्टा, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि माउली ज्ञानेश्वरांची मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आल्यानंतर संस्थेचे माजी अध्यक्ष तसेच सल्लागार, उपाध्यक्ष तसेच सचिवपद सांभाळून संस्थेच्या तीन कार्यकारिणीत भाग घेऊन ७५ री मुळे निवृत्त झालेल्या **श्री. डी. जी. निमकर यांच्या वयाला २ मार्च रोजी ८० वर्षे तसेच श्री. अशोकजी ढोरजे, माजी विश्वस्त यांनी वयाची पंचाहत्तरी पार केल्याबद्दल दोघांचाही पुणेरी पगडी, शाल, उपरणे, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री. निमकर यांच्या "नाबाद ८०" या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.** पुढील महत्त्वपूर्ण कार्यक्रमाची वेळ साधण्यासाठी मनोगते न होता प्रकाशनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. सौ. लिली जोशी यांना आदरपूर्वक व्यासपीठावर आणण्यात आले. त्या एम् बी.बी.एस., एम.डी. (मेडिसिन) असून त्यांनी बी. ए., एम् ए., पीएचडी संस्कृतमधून करून प्रत्येक परिक्षेत विद्यापीठात अव्वल नंबर पटकावलेला आहे. अशा विदुषीचे भाषण ऐकण्यासाठी उपस्थित श्रोत्यांचे कान आतुर झाले होते आणि डॉ. मॅडमनी आपल्या ओघवत्या शैलीत ३२ मिनिटे वस्त्र, साळी समाज यावर अस्खलितपणे बोलून उपस्थितांचे कान तृप्त केले. तत्पूर्वी "साळी समाज इतिहास संस्कृती व संशोधन" समूहाचे प्रा. सुभाष अढाव यांनी श्री. देवेन क्षीरसागर यांजकडून निवेदकाची सूत्रे हाती घेऊन श्री. चंद्रकांत हावरे, डॉ. सौ. लिली जोशी, संस्थेचे नूतन अध्यक्ष श्री. अमित उगले, "इतिहास"च्या १ल्या व २-या खंडाचे



**कै. बबनराव झिपरु सोनावणे, मुंबई यांच्या स्मरणार्थ**
**श्रीमती सुलोचनाबाई बबन सोनावणे व श्री. दिपक बबनराव सोनावणे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

संपादक श्री.सदाशिव चिंचकर, २-या खंडाचे संपादक आणि समूह प्रशासक श्री. डी. जी. निमकर आणि साळी समाज इतिहासाचार्य श्री. ल. रा. लोणकर यांना व्यासपीठावर आमंत्रित केले. व्यासपीठावरील आपल्या समाजातील सर्वांचा यथोचित सन्मान केल्यानंतर समारंभाचे अध्यक्ष श्री. हावरे आणि प्रमुख पाहुण्या सोडून सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर समारंभाच्या प्रमुख अतिथी विदुषी डॉ. सौ. लिली जोशी यांना शाल, उपरणे, श्रीफळ, पुष्पगुच्छ, श्री ज्ञानरायाची सुबक मूर्ती आणि सौ. उगले यांच्या हस्ते मानाचे वस्त्र पैठणी देण्यात आली.


यानंतर या समारंभाचे अध्यक्ष श्री.हावरे यांचे आभारप्रदर्शक दोन शब्द झाल्यानंतर आला कार्यक्रमाचा परमोच्च क्षण; "स्वकुळ साळी समाजाचा इतिहास" या तीन खंडी ८६४ पानी ग्रंथाचे प्रकाशन! "इतिहास" समूहाच्या प्रारंभीच्या १६० सदस्यांपासून सुरुवात होऊन अखेरी अखेरी उरलेल्या १५ जणांनी आत्मबळावर आणि आपण समाजाचे काही देणे लागतो या दृढविश्वासावर ठाम राहून लिहिलेल्या आपल्या समाजाच्या इतिहासाचे प्रकाशन! म्हणतात ना याचसाठी केला होता अट्टाहास! गेली पाच वर्षे अनंत कष्ट उपसून, कोरोना काळात आणि नंतरही शरीर साथ देतेय न देतेय याची तमा न बाळगता आम्ही हा ग्रंथ पूर्णत्वास नेला. त्याचा प्रकाशनक्षण जसजसा जवळ आला तसतशी हुरहूर वाढू लागली आणि ठीक दोन वाजता तो क्षण आला. व्यासपीठावरील सर्व, वर्धापनदिनाचे पाहुणे आणि संपादक मंडळातील उर्वरित उपस्थित सदस्य यांच्या हस्ते या साळी ग्रंथराजा चे टाळ्यांच्या जोरदार गजरात प्रकाशन झाले तो क्षण सर्वांची मने हेलावणारा होता. आम्हा "इतिहासकारां" ना कृतकृत्यतेचे समाधान देणारा होता. या ग्रंथाबरोबरच स्व. हरिदासजी भागवत यांनी माझ्याकडे "गीत जिव्हेश्वर" च्या पाठविलेल्या हस्तलिखिताच्या (छापील) पुस्तकाचेही प्रकाशन झाले. (ग्रंथाबरोबर 'गीत जिव्हेश्वर'ची प्रतही देण्यात येणार आहे.) यानंतर सौ. स्वाती ताटे यांच्या आवाजात पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

डॉ. लिलींच्या भाषणाने जणू गारुडच लोकांवर केले होते. त्या धुंदीतच सर्वांनी अडीच ते तीन सव्वातीनपर्यंत सुग्रास भोजनाचा आनंद लुटला. जेवणात ज्ञातिगृहाच्या पंगतीत नेहमी असणारा पाईन ॲपल शिरा होता. यानंतर अक्षरधाराचे श्री.महादेव साळी आणि त्यांच्या टीमने ग्रंथाच्या उपस्थित पृष्ठदात्यांना २४० प्रतींचे वाटप केले. ज्यांनी पृष्ठदान केले नाही परंतु "स्वकुळ साळी समाजाचा इतिहास" संग्रही असावा असे वाटते अशांनी श्री. हावरे, मोबा.९८६९१७३२७५ आणि श्री. महादेव साळी, मोबा.९९२२९६८५२५ यांच्याशी संपर्क साधावा.

नूतन तथा माजी विश्वस्त मंडळाचे देखील पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, नूतनविश्वस्त मंडळ, आळंदी कार्यकारणी (२०२६ ते २०३१ या कालावधीसाठी) पृष्ठ क्र. ०६ वर वाचावी.

**जय जिव्हेश्वर । जय अंकिनी - दशांकिनी माता**

**वृत्तांकन : डी.जी.निमकर, ठाणे.**






कै. श्री. करिअप्पा बुध्दिवंतअप्पा गच्ची व कै. श्रीमती गंगम्मा करिअप्पा गच्ची, गदग-बेटगेरी (कर्नाटक) यांच्या स्मरणार्थ डॉ. गोपाळकृष्ण करिअप्पा गच्ची, डोंबिवली यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज मंडळ प्रस्तुत वासंतिक मेळावा

दिनांक १२ एप्रिल २०२६, रविवार रोजी ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज प्रस्तुत वासंतिक मेळावा २०२६ हा डोंबिवली (पूर्व) येथील के. डी. अग्रवाल सभागृह, अयोध्या नगरी, मानपाडा रोड येथे अत्यंत उत्साहपूर्ण, रंगतदार आणि स्नेहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वसंत ऋतूच्या आगमनाचे स्वागत करणारा हा पारंपरिक सांस्कृतिक सोहळा यजमान स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था, डोंबिवली यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता.

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचे सल्लागार श्री. उदयकुमार साळी, कोषाध्यक्ष डॉ. किसनराव जेधे यांच्या आखीव-रेखीव नियोजनातून तसेच स्वकुळ साळी समाचार संपादक मंडळाच्या विशेष सहकार्याने हा बहारदार मेळावा साकारला. ठाणे जिल्ह्यातील सातही संलग्न संस्थांमधील सर्व वयोगटातील सुमारे १६० समाजबंधू-भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून एकात्मतेचे सुंदर दर्शन घडविले.

शिशिरातील मरगळ संपवत निसर्गात नवचैतन्य फुलवणाऱ्या व समस्त निसर्गात रंग-सुगंध व आनंदाची उधळण करणाऱ्या व उत्साहाचे संचार करणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनाचे स्वागत करण्यासाठी आयोजित केलेला पारंपारिक वासंतिक मेळावा सायंकाळी ४.०० वाजता सुरु झाला. सभागृहात आगमन करणाऱ्या प्रत्येक महिलांचे हळदी-कुंकू लावून, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्षा सौ. शैलजाताई सोमनाथ कासटकर यांच्याकडून गुळाची ढेप देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थितांना शितल व रुचकर कैरीचे पन्हे देऊन आदरातिथ्य करण्यात आले.

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाच्या सचिव ॲड. सोनाली दाहोत्रे यांनी प्रभावी प्रास्ताविकातून संगितले की सप्त सुरांचा वीण असलेला म्हणजेच सात स्थानिक संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून स्थापन झालेला ठाणे स्वकुळ समाज गेली अंदाजे ३० वर्षे विविध ठिकाणी हा वासंतिक सोहळा उत्साहात साजरा करत आहे आणि आपल्या एकात्मतेचा उत्कृष्ट परिचय देत आहे.

आपल्या संस्कृतीची, कलेची आणि सर्जनशीलतेची झलक दाखवणारा एक सुंदर सोहळ्याची परंपरा जोपासणेसाठी आयोजित करण्यात आलेल्या वासंतिक मेळावा २०२६ च्या कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली. कार्यक्रमात सादर होणाऱ्या विविध कलाकृतींना रसिकांनी मनापासून दाद द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास प्रारंभ करण्यापूर्वी काळाच्या पडद्याआड गेलेल्या ज्ञात-अज्ञात समाजबंधू-भगिनींना दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रथम टप्प्याच्या निवेदिका सौ. स्वाती आढाव यांनी कार्यक्रमाच्या सूत्र संचालनाची धुरा हाती घेऊन सांकृतिक वारसा जपणाऱ्या या वासंतिक मेळाव्याच्या कार्यक्रमाची चैतन्यमय सुरवात केली. सर्व प्रथम दीप प्रज्वलन करून श्री गणेशाची व भगवान जिव्हेश्वरांची आरती करून वातावरण मंगलमय करण्यात आले. या मंगलमय व पवित्र वातावरणात डोंबिवली स्वकुळ समाज महिला मंडळ यांनी त्यांच्या मधुर स्वरपूर्ण "मन की बीना से गुंजी ध्वनी मंगलम स्वागतम स्वागतम स्वागतम" या गीताने उपस्थित सर्वांचे स्वागत केले.

वासंतिक मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या सन्माननीय सौ. अश्विनीताई भरत मते (नगरसेविका व प्रभाग समिती एन वार्ड अध्यक्ष, घाटकोपर) यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे व सर्व उपस्थित मान्यवरांना सूत्र संचालिका सौ. स्वाती आढाव यांनी व्यासपीठावर मोठ्या सन्मानाने आमंत्रित केले.

सन्मानीय सौ. अश्विनीताई भरत मते (नगरसेविका व प्रभाग समिती अध्यक्षा घाटकोपर)

सौ. शैलजा सोमनाथ कासटकर (अध्यक्षा, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज)

श्री. उदयकुमार साळी (सल्लागार व माझी अध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज)

श्री. भालचंद्र साळी (सरचिटणीस अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज)

श्री. सोमनाथजी रातिलाल कासटकर (जेष्ठ सल्लागार ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज

श्रीमती अरुणा पवार, उपाध्यक्षा, ठाणे जिल्हा महिला मंडळ स्वकुळ साळी समाज



**कै. श्रीमती पार्वतीबाई महादेव दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ**
**श्री. विठोबा महादेव दुर्गुळे व सौ. विलासीनी विठोबा दुर्गुळे, भिवंडी यांच्या सौजन्याने पुष्ठदान.**

श्री. भरतजी मते मुंबई जेष्ठ सामाजिक कार्यकर्ता

डॉ. श्री. किसनराव जेधे, कोषाध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज

श्री. पंकज साळी, अध्यक्ष स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था डोंबिवली

श्री. ईश्वरलाल साळी (फंड), संपादक स्वकुळ समाचार

व्यासपीठावर आमंत्रित प्रत्येक मान्यवराचे पेन, गुलाबपुष्प, शाल देऊन सत्कार केला गेला. प्रत्येक मान्यवराने थोडक्यात त्यांचे मनोगत व्यक्त करीत कार्यक्रमात कलाकृती सादर करणाऱ्या प्रत्येकास शुभेच्छा दिल्या. ठाणे जिल्हा स्वकुळ साळी अध्यक्षा सौ. शैलजाताई कासटकर यांनी प्रमुख पाहुण्या सौ. अश्विनीताई मते यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पेन व जिव्हेश्वरांची पोथी देऊन विशेष सत्कार केला. सोबत त्यांचे यजमान श्री.भरत मते यांचा देखील शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाच्या सर्व स्थानीक संस्था अध्यक्षांचा व्यासपीठावर सत्कार करण्यात आला.

निवेदिका सौ. स्वाती आढाव यांनी प्रमुख पाहुण्यांच्या राजकीय वाटचाली व सामाजिक कार्याचा अल्पसा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्या सौ.अश्विनीताई मते यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना सांगितले की वासंतिक मेळाव्याचा हा पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम हा केवळ ठाणे जिल्हाच सातत्याने एकजुटीने साजरा करीत आहे व मुंबईत असा कार्यक्रम पहायला मिळत नाही. अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज सरचिटणीस श्री. भालचंद्र साळी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले की ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज अखंड भारताच्या स्वकुळ साळी समाजाचे प्रतिनिधित्व करतो व नवनवीन उद्यमपूर्ण संकल्पना घेऊन येतो ज्याचे अनुकरण इतर संस्था अनायास करतात, त्यामुळे अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज यांचे येत्या नोव्हेंबर व महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज यांचे येत्या ऑक्टोबर महिन्यात संपन्न होणाऱ्या मेळाव्यात ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाने असाधारण/विलोभनीय कलाकृती सादर करून आपली विशेष छाप सोडावी. कार्यक्रम द्वितीय टप्प्याकडे वळण्यापूर्वी प्रमुख पाहुण्या सौ.अश्विनीताई भरत मते यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे डोंबिवलीचे स्वकुळ साळी समाजाचे जेष्ठ नागरिकांचा अनमोल सामाजिक कार्यासाठी ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. किमान ११० पुस्तके प्रसिध्द करून मराठी साहित्य जगतात आपले अमुल्य योगदान देणाऱ्या व समाज उद्बोधनपर लेख लिहून समाज प्रबोधन करणाऱ्या सौ. मंदाताई खापरे (वय वर्षे ८३) यांचा साडी, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व भरभरून कौतुक केले. महाराष्ट्र प्रांतीकचे माजी अध्यक्ष तसेच ठाणे जिल्हा माजी अध्यक्ष व संपादक, विद्यमान सल्लागार श्री सोमनाथ कासटकर यांचा सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र प्रांतीकचे व ठाणे जिल्ह्याचे माजी कोषाध्यक्ष श्री. बारसू रामदास सीताफळे यांचा सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला.

निवेदिका सौ. स्मिता तगारे यांनी त्यांच्या अलंकारिक व प्रभावी शब्दांनी वसंताच्या या रंगतदार सोहळ्याच्या द्वितीय टप्प्याच्या सूत्र संचलनाची धुरा हाती घेतली आणि कलेच्या सुंदर, रंगीबिरंगी बहारदार प्रवास सुरु झाला. द्वितीय टप्पा म्हणजेच सांस्कृतिक कार्यक्रम ज्याचा श्रीगणेशा झाला- महिषासुर मर्दिनी स्तोत्राने जे उत्कृष्टरीत्या सादर केले अंबरनाथ स्वकुळ साळी समाज महिला मंडळ यांनी. प्रमुख पाहुण्या सौ. अश्विनीताई मते यांच्या हस्ते ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजातर्फे स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व डोंबिवली स्वकुळ साळी समाजातर्फे ज्या समाजबांधवांनी व कार्यकर्त्यांनी अमुल्य योगदान दिले त्या सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणारे सर्व सहभागी कलाकार, कार्यकर्ते, सुत्रसंचलन करणारे सौ. स्मिता तगारे व सौ. स्वाती आढाव त्याच प्रमाणे कार्यक्रमाची नियोजन पूर्ण आयोजन करण्यासाठी अथक परीश्रम घेणारे सल्लागार श्री. उदयकुमार साळी, कोषाध्यक्ष डॉ. किसनराव जेधे, संपादक श्री. ईश्वरलाल साळी, सचिव ॲड. सोनाली दाहोत्रे, डोंबिवली अध्यक्ष श्री. पंकज साळी व सर्व पदाधिकारी व महिला मंडळ कार्यकर्ते यांचे ठाणे जिल्हा अध्यक्ष सौ. शैलजाताई कासटकर यांनी विशेष आभार मानले व त्यानंतर सर्वांनी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला.

**वृतांकन : ॲड. सोनाली दाहोत्रे**

**कै. श्रीमती पार्वतीबाई महादेव दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ**
**श्री. विठोबा महादेव दुर्गुळे व सौ. विलासीनी विठोबा दुर्गुळे,**
**भिवंडी यांच्या सौजन्याने पुष्ठदान.**

## ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ साळी समाज हितसंवर्धक संस्था डोंबिवली
## आयोजित वासंतिक मेळावा क्षणचित्रे दि.१२ एप्रिल २०२६





## ||शुभविवाह सोहळा||

**चि. विप्लव**
(श्री.राजेश प्रल्हाद धुळे,
सुरत यांचे सुपुत्र)

व

**चिं. सौ. का. प्रिया**
(श्री.नारायण प्रभाकर सातपुते,
सुरत यांची कन्या)

### यांचा शुभविवाह

**मंगळवार दि. २१/०४/२०२६ रोजी**

### विधाता गार्डन रेस्टॉरंट,

**भरीमाता रोड, कोजवे चार रस्ता, सुरत**
**येथे थाटामाटात पडला.**

**विवाहप्रसंगी सर्व मान्यवर समाज कार्यकर्ते व समाज बांधव**

सातपुते, धमके, माळोदे, डरंगे, धरम, पाटेकर,
बुलबुले, बेलसरे, भागवत, फंड, नाशिककर, गरुड, खेडकर,
मडके, चौधरी, आमते, भंबाळे, मुरकुटे, बारगजे, खंडारे,
महंकर, वाझट, ढगे, लाडके, लायगे, तांबे, भोगरे, आहिरे,
सिताफळे, भिंगारे, मोकाट, कासटकर, राऊत, भुतकर,
डहाके, गायकवाड व समस्त धुळे परिवार यांनी उपस्थित राहून
वधू-वरांना **शुभ आशीर्वाद** दिले

**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे**

## नवविवाहित दांपत्यास
## भावी आयुष्यासाठी शुभेच्छा.

**If undelivered please return to:**

May + June
2026

**Swakul Samachar**

**Editor - Mr. Ishwarlal E. Sali (Fand)**
B-304, Channur Bhuvan CHS,
G. Gupte Road, Vishnu Nagar,
Dombivli (West) - 421 202.

या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक
सहमत असतातच असे नाही .... संपादक

To,

Printer & Publisher Mr. Barsu R. Sitafale on behalf of Thane Jillah Swakul Sali Samaj Printed at Laxmi Printers, 4. Mohini Soc., Anand Nagar, Dombivli (W) Dist. Thane - 421 202 Published at:B/303, Rutuvrat Co-op.Hsg.Soc.,Anand Nagar, Dindayal Rd., Near Indrayani Hospital, Dombivali (W), Dist. Thane-421 202

Editor :- Mr. Ishwarlal E. Sali RNI No. MAHMAR/2014/57230